बा वा
२२४८

भा. ग्रं. सं. कां., ... शाखा.
... 
क्र. २२४८ दिनांक २०।९।८८
विषय बावा क्र. ....

चिकित्सक विद्यार्थी, सजग पालक
व शिक्षक-अध्यापक यांना–

BVBK-0402248

BVBK-0402248

विद्यापीठ ग्रंथालये, विविध नियतकालिके धुंडाळावी लागली. सर्वस्तरीय माध्यमांद्वारे माहिती गोळा करण्यात दोन-अडीच वर्षांहून अधिक काळ गेला. हे करीत असताना अनेक पत्रकार, ग्रंथपाल, शिक्षक, पालक यांनी चांगलेच सहकार्य व प्रोत्साहन दिले. अशा प्रकारची संकलित माहिती कुठेच नसल्याने छोटासा संदर्भ-ग्रंथ होईल म्हणून या लेखनाची आवश्यकता असल्याचे बोलून दाखविले. एक एक लेख पूर्ण होत गेला. पुरस्कारांची संख्या वाढत गेली. नवनवीन पुरस्कार निर्माण होत गेले व होत आहेत. सर्वांचीच नोंद या ठिकाणी झालेली नाही. शक्यही नाही. पण महत्त्वाचे पुरस्कार कसे येतील ही दक्षता घेतली आहे. यातील काही लेख बालवाडी, दै. पुढारी (रवि. आवृत्ती) यांतून लेख-मालेच्या रूपाने प्रसिद्ध झाले. या प्रसिद्धीबद्दल मी संपादकांचा ऋणी आहे. शिवाजी विद्यापीठ, न्यू कॉलेज येथील ग्रंथालयातील ग्रंथपाल व सहायक ग्रंथपाल यांचाही ऋणी आहे. लेखमालेनंतर पुस्तकासाठी म. सा. प. चे माजी कार्यवाह श्री. म. श्री. दीक्षित यांनी बहुमोल सूचना केल्या व प्रास्ताविक लिहिले त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच आहे. लेखमाला सुरू असताना पुस्तका-साठी काही प्रकाशकांना नाराज करावे लागले. कारण या सर्व खटा-टोपासाठी व कार्यपूर्तीसाठी 'मीनल प्रकाशन' सतत पाठीशी होते. त्यांचे शब्द नसते तर हे रटाळ काम पूर्ण झाले असते की नाही शंकाच आहे ! स्नेहबंध असला तरी त्यांचे ऋण टाळता येणार नाही. पुस्तकाचे स्वरूप, त्याची उपयुक्तता ही विद्यार्थी, पालक, शिक्षक आपण कोणीही असा, आपणच अजमावावयाची आहे. आपल्या मतावरच पुस्तकाचे यशापयश अवलंबून आहे.

—मोहन जोशी

## दोन शब्द

'असे पुरस्कार अशी पारितोषिके' या लेखमालेचा जन्म चिकित्सक प्रश्नमालिकेतून झाला. रवींद्रनाथ टागोर यांचेवरील धडा वाचताना, 'गीतांजली' या त्यांच्या काव्यसंग्रहास नोबेल पारितोषिक मिळाले, असा एका ओळीत उल्लेख होता. नोबेल पारितोषिक म्हणजे काय ? ते कोण देतात ? असा प्रश्न माझ्या मुलाने विचारला. या प्रश्नाचे मी थोडक्यात कसेबसे उत्तर दिले. पण आतून वेचैन होतो. कारण, त्याने विचारले नाही तरी पुढेही काही प्रश्न होते. त्याची उत्तरे मलाही माहीत नव्हती. कुठल्याही जबाबदार पालकाला आणि शिक्षकालाही हे प्रश्न असेच भेडसावत राहतील. आपल्या अज्ञानाची कीवही वाटेल. ही जाणीव मनात होती. एखादे पारितोषिक कोण देतात ? कुणाला देतात ? विशिष्ट नावानेच का देतात ? त्यामागील इतिहास काय ? पुरस्कारित व्यक्तीची निवड कशी होते ? समितीची रचना व कार्य कसे असते ? पुरस्कार मिळणाऱ्या व्यक्तीचे कार्यकर्तृत्व ? पुरस्कार जागतिक असेल तर आपल्या देशात कोणी कोणी तो मिळविला ? इत्यादी प्रश्न सहज भेडसावत राहतात. कुठलेही नियतकालिक व संदर्भग्रंथ या प्रश्नांची एकत्रित उत्तरे देऊ शकत नाहीत. अनेक महत्त्वाच्या पुरस्कारांची नावे पालकांनाच नव्हे, तर शिक्षक-अध्यापकांनाही माहीत नसतात. अशा महत्त्वाच्या जागतिक, राष्ट्रीय व प्रादेशिक पुरस्कारांची थोडक्यात पण समग्र माहिती एकत्रितरीत्या दिली तर ? प्रश्नाबरोबर काम सुरू झाले. थोड्याच दिवसात कळून चुकले की, हे वाटते तितके सोपे नाही. विविध संस्था, प्रतिष्ठाने, दूतावास, सरकारी संस्था यांचेशी पत्रव्यवहार, स्मरणपत्रे लिहून काही कागदपत्रे हाती आली. महाविद्यालयीन व

# प्रास्ताविक

कोल्हापूरचे एक लेखक श्री. मोहन जोशी यांचे ' असे पुरस्कार, अशी पारितोषिके ' हे दोन भागात प्रसिद्ध होत असलेले पुस्तक नाविन्यपूर्ण असून त्याची संदर्भात्मक उपयुक्तता विशेष आहे. विविध पुरस्कार आणि पारितोषिके यांची तपशिलवार माहिती देणारे मराठीतले हे पहिलेच पुस्तक असावे. श्री. जोशी यांनी ते अतिशय साक्षेपाने, सुलभ भाषेत आणि परिश्रमपूर्वक लिहिले आहे. मराठी जाणते वाचक या पुस्तकाचे स्वागत करतील, किंबहुना संग्रही बाळगतील अशी अपेक्षा आहे. (पुस्तकातील लेख रविवार ' दै. पुढारी ' अंकात व बालवाडीत प्रसिद्ध झालेले होते. तथापि पुस्तकात ते संस्करणासह प्रसिद्ध होत आहेत.)

अमुक-तमुक व्यक्तीस कोणत्या ना कोणत्या सत्कृत्यासाठी पुरस्कार वा पारितोषिक मिळाले, अशा वार्ता आपण वर्तमानपत्रात नेहमी वाचतो. ज्याला असा सन्मान लाभतो त्याला, त्याच्या समाजाला आणि देशाला साहजिकच आनंद होतो व सन्मानप्राप्त व्यक्तीवर अभिनंदनाचा वर्षाव होतो. या पुरस्कार आणि पारितोषिकांमुळे देणाऱ्या आणि घेणाऱ्या व्यक्तीचा आणि संस्थेचाही गौरव होतो. तसेच पुरस्कार–पारितोषिकांमुळे अप्रत्यक्षत: समाजसेवक, साहित्यिक, शास्त्रज्ञ, कलावंत, गायक, खेळाडू, पत्रकार, इत्यादींच्या कार्याचे चीज होते. शिवाय त्यामुळे अनेकांना कर्तृत्व दाखविण्याची प्रेरणाही मिळते. थोडक्यात सांगायचे तर माणसातील सुप्त वा प्रकट गुणांना फुलविण्याचे कार्य पुरस्कार आणि पारितोषिके यामुळे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे होत असते.

श्री. मोहन जोशी यांच्या प्रस्तुत पुस्तकात सत्तावीस विविध लहानमोठ्या पुरस्कारांची व पारितोषिकांची त्यांच्या निर्मितीसह अद्यावत माहिती देण्याचा प्रामाणिक यत्न आहे. जागतिक, भारतीय आणि प्रादेशिक (महाराष्ट्र) अशा तीन पातळ्यांवरील सन्मानांचा या पुस्तकात समावेश आहे. जात, धर्म, भाषा, देश यांपैकी कसल्याही अवांतर गोष्टींचा विचार न करता गुणवत्तेच्या कसोटीवर पारखून सन्माननीय व्यक्ती निवडली जाते. त्यासाठी समित्या वा सल्लागार मंडळे असतात. श्री. जोशी यांनी ही सर्व माहिती आस्थेवाईकपणे दिली आहे. या माहितीत काही भर घालता येईल किंवा काही उणिवाही जाणवतील. तथापि लेखकाने माहिती-संकलनाचे बाबतीत परिश्रम खूप केले आहेत याची खात्री पटते. प्राचीन व मध्ययुगात राजेरजवाड्यांकडून गुणीजनांना आश्रय मिळे व त्यांचे सन्मान होत. आजच्या लोकशाहीच्या युगात हे कार्य लोकनियुक्त शासनांकडून किंवा काही मान्यवर संस्थांकडून होत आहे ही फार आनंदाची गोष्ट आहे. श्री. मोहन जोशी यांनी मराठीत एका नित्योपयोगी पुस्तकाची भर घातली याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन.

**म. श्री. दीक्षित**

२३–१–१९८८

# अनुक्रमणिका


| पुरस्कार | पृष्ठ क्र. |
|---|---|
| १. नोबेल आणि नोबेल पुरस्कार | ९ |
| २. ऑस्कर पुरस्कार | १६ |
| ३. कलिंग पुरस्कार | २४ |
| ४. नेहरू पुरस्कार | ३० |
| ५. सोविएत– नेहरू पुरस्कार | ३६ |
| ६. डेमियन– डटन पुरस्कार | ४१ |
| ७. मॅगसेसे पुरस्कार | ४७ |
| ८. किंग पुरस्कार | ५२ |
| ९. ज्ञानपीठ पुरस्कार | ५८ |
| १०. अर्जुन पुरस्कार | ६४ |
| ११. कालिदास पुरस्कार | ७० |
| १२. फाळके पुरस्कार | ७४ |
| १३. श्री शिवछत्रपति पुरस्कार | ७९ |
| १४. शाहू पुरस्कार | ८३ |

bad Book

२२४८ दि. २०।५।८८



## नोबेल आणि नोबेल पुरस्कार

इ. स. १९१३ मध्ये गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांच्या 'गीतांजली' या काव्यसंग्रहाला 'नोबेलपारितोषिक' मिळाले. या पारितोषिकामुळे रवींद्रनाथांचे नाव जगभर झाले. जगातील प्रथम दर्जाचे पारितोषिक मिळविणारे ते पहिलेच भारतीय होते. त्यामुळे भारताची शानही वाढली होती.

हे पारितोषिक कुणाच्या प्रेरणेने सुरू झाले? केव्हा सुरू झाले? ते कुणाला दिले जाते? ही माहिती आपल्याला ठाऊक असणे जरूर आहे.

नोबेल पारितोषिकाचा जनक आहे स्वत: नोबेल. त्याचे पूर्ण नाव आल्फरेड बर्नहार्ड नोबेल. स्वीडनची राजधानी स्टॉकहोम येथे २१ ऑक्टोबर १८३३ मध्ये नोबेलचा जन्म झाला. सुरुंग-नौका (टोर्पेडो), तसेच रेल्वेसाठी लागणारे साहित्य तयार कर-

ण्याचा त्याच्या वडिलांचा कारखाना होता. हा कारखाना रशिया-तील सेंटपीटर्सबर्ग येथे होता.

ऑल्फ्रेड नोबेल जन्मजात कुशाग्र बुद्धीचा होता. शाळेत न जाता, घरीच चांगल्या शिक्षकाकडून त्याचे शिक्षण होत होते. वयाच्या १६ व्या वर्षी तो रसायनशास्त्रात पारंगत झाला. इंग्रजी, रशियन, फ्रेंच, जर्मन आणि स्वीडिश अशा पाच भाषांवर त्याने प्रभुत्व मिळविले.

युद्धसमाप्तीनंतर इ. स. १८५९ च्या सुमारास त्यांच्या कार खान्याचे दिवाळे निघाले. त्यानंतर रशियात राहणेही मुष्कील झाले. त्यामुळे नोबेल कुटुंब मायदेशी स्वीडनला परतले.

स्वीडनला आल्यावर ऑल्फ्रेड गप्प बसला नाही. यंत्रे आणि रसायने त्याला बोलावित होती. उत्साही स्वभाव गप्प बसू देत नव्हता. पुन्हा त्याने स्वतःला स्फोटक पदार्थांच्या संशोधनात झोकून घेतले. ह्या संशोधनातूनच त्याने वेगवेगळ्या प्रकारची स्फोटक द्रव्ये शोधून काढली. त्यात अतिस्फोटक द्रवपदार्थही होते. पुढे तर स्फोटक द्रव्ये तयार करण्याचा कारखानाच त्याने सुरू केला. जगाच्या कानाकोपऱ्यातून त्याच्या मालाला मागणी येऊ लागली. नायट्रोग्लिसरीनसारख्या स्फोटक द्रवपदार्थाचे उत्पादन इतरत्र होत नव्हते. त्यामुळे नोबेल आपल्या व्यवसायात झपाट्याने पुढे आला. थोड्याच वर्षात नोबेल प्रसिद्ध कारखानदार नि कोट्यधीश म्हणून ओळखला जाऊ लागला.

तथापि त्याने एक गोष्ट जाणली. ती ही की, आपण जी स्फोटक द्रव्ये निर्माण करतो त्यांच्या उपयोगाने जगातील राष्ट्रे बाँब, सुरुंग यासारख्या मानवी संहार करणाऱ्या वस्तू तयार कर-तात. युद्धातून त्यांचा मोठ्या प्रमाणावर वापर करण्यात येतो.

मनुष्यहानीबरोबर शांतता व राष्ट्रा-राष्ट्रातील स्नेहसंबंध यांचेही अगणित नुकसान होते. असे होता कामा नये. राष्ट्रा-राष्ट्रातील स्नेह-संबंध जोपासले गेले पाहिजेत. मैत्री वाढली पाहिजे. जगात शांतता नांदायला हवी. आपल्या संशोधनाचा व उत्पादनाचा उपयोग लोकोपयोगी वस्तू निर्माण करण्यासाठी व्हायला हवा. पण याकडे कुठला देश लक्ष देत नाही.आपण बनवीत असलेल्या स्फोटक द्रव्यांनी मानवी संहाराऐवजी मानवाला उपयुक्त अशी साधनसामुग्री बन-विण्यात यावी. युद्धाऐवजी राष्ट्राराष्ट्रात मैत्री व स्नेहसंबंध वाढीला लागावेत, माणसाला माणूस म्हणून निर्भयतेने राहता यावे. ह्या विचारांनी तो अस्वस्थ झाला. ऑल्फरेड नोबेल एकीकडे अलोट संपत्ती मिळवीत होता; पण त्याचबरोबर वरील विचारांमुळे अस्वस्थ होत होता. त्याचे विचार हे नुसते विचारच राहिले नाहीत. ह्या अस्वस्थ विचारातूनच त्याला प्रकाशकिरण दिसले. तेच हे 'नोबेल पारितोषिक' होय.

ऑल्फरेड नोबेल इ. स. १८९६ मध्ये सानरिमो (इटली) येथे मरण पावला. पण जागतिक शांतता, शास्त्र व साहित्य (वाङ्-मय) यात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या व्यक्तींसाठी त्याने मिळ-विलेल्या संपत्तीमधील मोठा भाग बाजूला ठेवला. या निधीतून दरवर्षी पाच पारितोषिके देण्याची योजना ठेवली. दरवर्षी देण्यात येणाऱ्या पाच पारितोषिकांनाच नोबेल पारितोषिक असे म्हणतात.

दरवर्षी खालीलप्रमाणे पाच विभागांत ही पारितोषिके देण्यात येतात.

१) रसायनशास्त्र,

२) पदार्थविज्ञान,

३) वैद्यकशास्त्र,

४) साहित्य (वाङ्मय),
५) शांतता, सलोखा,

वरीलप्रमाणे त्या त्या विषयात अत्युत्कृष्ट कामगिरी बजावलेली व्यक्ती नोबेल पारितोषिकासाठी निवडण्यात येते.

नोबेलफंडा (निधी) साठी स्वतंत्र मंडळ स्थापण्यात आले आहे. पाच विभागांतील पारितोषिकांसाठी विभागवार पाच समित्या काम करीत असतात. समिती आपापल्या क्षेत्रात अधिक चांगले कार्य कोणी केले, हे पाहून त्याचा अहवाल व नावे मंडळाकडे पाठवीत असते. मंडळात त्या नावाचा विचार होतो. ह्या मंडळाचा अध्यक्ष स्वीडिश सरकारने नियुक्त केलेला असतो. पारितोषिकासाठी शिफारस झालेल्या व्यक्तींचे कार्य लक्षात घेऊन मगच त्यांची निवड करण्यात येते. दरवर्षी साधारणपणे १० डिसेंबरला नोबेल पारितोषिकांचे समारंभपूर्वक वितरण होते. साहजिकच त्यापूर्वी ही पारितोषिके जाहीर करावी लागतात. १० डिसेंबर हा नोबेलचा पुण्यतिथीचा दिवस असल्याने पुरस्कार वितरण समारंभ याच दिवशी आयोजित करण्यात समितीने मोठे औचित्य साधले आहे.

पहिली नोबेल पारितोषिके १९०१ साली नोबेलच्या पाचव्या पुण्यतिथीच्या दिवशी देण्यात आली.

या पाच पारितोषिकांशिवाय स्वीडनच्या बँकेमार्फत सहावे पारितोषिक सुरू करण्यात आले आहे. अर्थशास्त्र या विषयात प्राविण्य व उत्कृष्ट कार्य करणाऱ्या जगातील श्रेष्ठ व्यक्तींची यासाठी निवड करण्यात येते. हे पारितोषिक इ. स. १९६१पासून सुरू झाले आहे.

पुरस्कारप्राप्त व्यक्तीस सुवर्णपदक, त्याचे कार्य व त्या क्षेत्रा-

तील अधिकार दर्शविणारे सन्मानपत्र आणि रोख रक्कम दिली जाते. या रकमेत सतत वाढ होत असते. १९८७ पासून पारितोषिकाचे मूल्य ३ लाख ४३ हजार डॉलर्स होत आहे, असे प्रतिष्ठानचे अध्यक्ष स्टिग रामेल यांनी सांगितले. सुवर्णपदकाच्या एका बाजूस आल्फरेड नोबेल यांची प्रतिमा आणि दुसऱ्या बाजूस त्या त्या क्षेत्राचे दर्शक चिन्ह असते.

एका व्यक्तीला एकापेक्षा अधिक क्षेत्रातील कार्य केल्याबद्दलही पुरस्कार देण्यात येतो. मारी क्युरीस १९०३ मध्ये भौतिक व १९११ मध्ये रसायनमधील नोबेल पुरस्कार मिळाला आहे.

प्रत्येक पुरस्कारप्राप्त व्यक्तीस सहा महिन्यापर्यंत त्याच्या कार्यासंबंधी एक व्याख्यान द्यावे लागते. या व्याख्यानास ' नोबेल लेक्चर्स ' असे म्हणतात. Les Prix Nobel या वार्षिकातून ही लेक्चर्स प्रसारित केली जातात.

धर्म, संप्रदाय, वंश इत्यादी गोष्टी पुरस्काराच्या आड येत नाहीत. जगातील कोणत्याही राष्ट्रातील व्यक्तींच्या कार्याचा गौरव नोबेल पारितोषिकाने होत असतो. त्यामुळे व्यक्तीच्या नावाबरोबर पर्यायाने त्या राष्ट्राचाही गौरव होतो. पारितोषिक मिळविण्यासाठी कुठलीही परीक्षा नाही, स्पर्धा नाही. निरलसपणे, सेवाभावाने आपल्या क्षेत्रात कार्य करणे, हीच एक कसोटी असते. एखाद्या वर्षी एखाद्या विभागात पारितोषिकासाठी लायक व्यक्ती आढळली नाही तर त्या विभागाचे पारितोषिक त्या वर्षी देण्यात येत नाही. याउलट, जर एकाहून अधिक व्यक्तींना पारितोषिक द्यावयाचे झाले तर ते विभागून दिले जाते.

' एक्स-रे 'चा शोध लावणारा रोन्टजेन हा जर्मन शास्त्रज्ञ पदार्थविज्ञानाचे १९०१ चे पहिले नोबेल पारितोषिक पटकावणारा

होता.

रवींद्रनाथ टागोर यांच्यानंतर १९३० मध्ये भारताने पुन्हा एकवार नोबेल पारितोषिक मिळविले. 'रामन इफेक्ट'चा शोध लावल्याबद्दल पदार्थविज्ञानमधील हे नोबेल पारितोषिक सर चंद्र-शेखर रामन यांना मिळाले.

गुरुदेव रवींद्रनाथ टागोर व सर चंद्रशेखर रामन हे भारताचे भाग्यविधातेच आहेत असे म्हटले पाहिजे. अलीकडे अमेरिकेत वास्तव्य करून असलेले डॉ. खोराना, डॉ. चंद्रशेखर यांनी, तसेच भारतात वास्तव्य करून असलेल्या मदर तेरेसांनी नोबेल पुरस्कार मिळवून पुन्हा एकदा भारताचे नाव उज्ज्वल केले आहे.

आल्फ्रेड नोबेलने मिळविलेल्या पैशातून त्याच्याच विचार-प्रेरणांनी जे मूर्त स्वरूप घेतले त्यामुळे नोबेलचे कार्यकर्तृत्व चिरंतन राहिले. शिवाय, विविध क्षेत्रांतील महनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सतत शोध घेऊन, त्यांचे कार्य सत्कारणी लावणाऱ्या नोबेल पारितोषिकामुळे, नोबेलच्या आंतरिक इच्छा-आकांक्षांची पूर्ती होत असते. राष्ट्राराष्ट्रातील शांतता व स्नेहसंबंध दृढ होत राहतात. हे कार्य आपोआपच साधले जाते. शिवाय, रवींद्रनाथ टागोर, मदर तेरेसा यांसारख्या राष्ट्रसेवेला वाहून घेतलेल्या व्यक्ती, पारितोषिकाच्या रकमेचा संस्थेच्या कार्यासाठी विनियोग करीत असतात. त्यामुळे तर सोन्याला सुगंध लाभल्याप्रमाणे पारितोषिकाची व ते मिळविणाऱ्या व्यक्तींची शान आणखीन वाढते.

## १९८७ मधील नोबेल पुरस्कार विजेते

*                    *

**वैद्यक शास्त्र** :– सुसुमू टोनिग्वा (जपान)


**शांतता** :– ऑस्कर अरियास (कॉस्टारिका)

**पदार्थविज्ञान** :– जॉर्ज बेडनोर्झ (प. जर्मनी)

के. अलेक्स मुल्लर (स्वित्झर्लंड)

**अर्थशास्त्र** :– रॉबर्ट एम. सोलो (अमेरिका)

**साहित्य** :– जोसेफ ब्रॉडस्की (रशियन कवी– सध्या अमेरिकेत वास्तव्य)




१९८३ साल हे भारतीय चित्रपटकलावंतांच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवावं असं आहे.

आजपर्यंत फक्त ऐकिवात होता तो ऑस्कर पुरस्कार भारताने या वर्षी खेचून आणला. महाराष्ट्रातील श्रीमती भानू अथैय्या या एका महिलेने भारताला हा सर्वोच्च बहुमान मिळवून दिलेला आहे. श्रीमती भानुमती अथैय्या ह्या मूळच्या कोल्हापूरच्या. जन्म, बालपण, शिक्षण कोल्हापूरलाच झाले. त्यांचे वडील कै. अण्णा-साहेब राजोपाध्ये हे उत्कृष्ट चित्रकार व मूर्तिकार होते. त्यांचाच

वारसा घेऊन श्रीमती अथैय्यांनी हा जागतिक कीर्तीचा बहुमान मिळविला.


वेशभूषेचं 'ऑस्कर' पारितोषिक श्रीमती भानू अथैय्या व जॉन मोले या दोघांना विभागून असले तरी 'गांधी' चित्रपटातील ८० टक्के वेषभूषा श्रीमती अथैय्या यांनीच केलेली आहे. शिवाय, जॉन मोले यांना गेल्या वर्षीच 'स्टार वॉर्स' या चित्रपटातील वेषभूषेसाठी 'ऑस्कर' मिळालं होतं. म्हणून श्रीमती भानू अथैय्या यांनी १९८३ च्या ऑस्करचा स्वीकार केला.

श्रीमती भानू अथैय्या यांच्याबरोबरच 'गांधी' या चित्रपटाने आणखी सात 'ऑस्कर' पुरस्कार पटकावले. म्हणजेच एकूण आठ पुरस्कार घेऊन 'गांधी' चित्रपटाने हॅटट्रीक मारली. महात्मा गांधी भारताचे होते ते क्षणात जगाचे होऊन गेले.

ऑस्कर पारितोषिक वितरण समारंभास हजर असणाऱ्या कलावंतांना व खुद्द पारितोषिक विजेत्यालाही अगदी अखेरच्या क्षणापर्यंत पत्ता नसतो की, आपल्याला ऑस्कर मिळणार आहे. म्हणूनच पारितोषिकांच्या जगात ऑस्करची शान काही औरच आहे.

चित्रपटसृष्टीतील 'नोबेल पुरस्कार' अशा सार्थ नावाने ह्या पुरस्काराचा उल्लेख केला जातो.

'चलत् चित्रपट कला आणि विज्ञान अकादमी' या नावाची संस्था अमेरिकेत कार्य करीत आहे. चित्रपटसृष्टीतील सर्वांगीण संशोधन या संस्थेद्वारे होत असते. चौतीस सभासदांनी ही संस्था स्थापन केली. मेयर नावाच्या सभासदाने पुरस्कार देण्याविषयी कल्पना मांडली. बहुतेक सर्व सभासदांना ती आवडली. चित्रपटसृष्टीत आमूलाग्र सुधारणा व्हावी, नाविन्यपूर्ण कल्पना आणि




१९८३ साल हे भारतीय चित्रपटकलावंतांच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवावं असं आहे.

आजपर्यंत फक्त ऐकिवात होता तो ऑस्कर पुरस्कार भारताने या वर्षी खेचून आणला. महाराष्ट्रातील श्रीमती भानू अथैय्या या एका महिलेने भारताला हा सर्वोच्च बहुमान मिळवून दिलेला आहे. श्रीमती भानुमती अथैय्या ह्या मूळच्या कोल्हापूरच्या. जन्म, बालपण, शिक्षण कोल्हापूरलाच झाले. त्यांचे वडील कै. अण्णासाहेब राजोपाध्ये हे उत्कृष्ट चित्रकार व मूर्तिकार होते. त्यांचाच

वारसा घेऊन श्रीमती अथैय्यांनी हा जागतिक कीर्तीचा बहुमान मिळविला.

वेशभूषेचं ' ऑस्कर ' पारितोषिक श्रीमती भानू अथैय्या व जॉन मोले या दोघांना विभागून असले तरी ' गांधी ' चित्रपटातील ८० टक्के वेषभूषा श्रीमती अथैय्या यांनीच केलेली आहे. शिवाय, जॉन मोले यांना गेल्या वर्षीच ' स्टार वॉर्स ' या चित्रपटातील वेषभूषेसाठी ' ऑस्कर ' मिळालं होतं. म्हणून श्रीमती भानू अथैय्या यांनी १९८३ च्या ऑस्करचा स्वीकार केला.

श्रीमती भानू अथैय्या यांच्याबरोबरच ' गांधी ' या चित्रपटाने आणखी सात ' ऑस्कर ' पुरस्कार पटकावले. म्हणजेच एकूण आठ पुरस्कार घेऊन ' गांधी ' चित्रपटाने हॅटट्रीक मारली. महात्मा गांधी भारताचे होते ते क्षणात जगाचे होऊन गेले.

ऑस्कर पारितोषिक वितरण समारंभास हजर असणाऱ्या कलावंतांना व खुद्द पारितोषिक विजेत्यालाही अगदी अखेरच्या क्षणापर्यंत पत्ता नसतो की, आपल्याला ऑस्कर मिळणार आहे. म्हणूनच पारितोषिकांच्या जगात ऑस्करची शान काही औरच आहे.

चित्रपटसृष्टीतील ' नोबेल पुरस्कार ' अशा सार्थ नावाने ह्या पुरस्काराचा उल्लेख केला जातो.

' चलत् चित्रपट कला आणि विज्ञान अकादमी ' या नावाची संस्था अमेरिकेत कार्य करीत आहे. चित्रपटसृष्टीतील सर्वांगीण संशोधन या संस्थेद्वारे होत असते. चौतीस सभासदांनी ही संस्था स्थापन केली. मेयर नावाच्या सभासदाने पुरस्कार देण्याविषयी कल्पना मांडली. बहुतेक सर्व सभासदांना ती आवडली. चित्रपटसृष्टीत आमूलाग्र सुधारणा व्हावी, नाविन्यपूर्ण कल्पना आणि

नेटकेपणा यावा, नवनवीन तंत्रांचा अवलंब व्हावा हा हेतू पुरस्कार सुरू करण्यामागे होता. संस्थेच्या कार्यक्रमाचा एक भाग असेही त्याचे स्वरूप होते.

मेयरची ही कल्पना लगेच मूर्तस्वरूप घेऊ लागली. विचारमंथनातून पुरस्काराचे स्वरूप साकार झाले. तोच आजचा हा ऑस्कर पुरस्कार होय. राजकारण, बड्यांचे दडपण, वशिलेबाजी अशा प्रकारची हीनता इथे आजही आढळून येणार नाही. त्यामुळेच ऑस्कर पुरस्कार मिळणे म्हणजे चित्रपटसृष्टीच्या जगात सर्वोच्च बहुमान समजण्यात येतो.

हा ऑस्कर कोण होता ? त्याच्या नावे हा पुरस्कार का दिला जावा ? ह्या प्रश्नाची उत्तरे शोधली असता गमतीची माहिती हाती येते. पुरस्कार देण्याचे ठरल्यानंतर तो कोणत्या स्वरूपात द्यायचा, हा प्रश्न अकादमीच्या सभासदांपुढे उभा राहिला. यासंबंधीच्या वेगवेगळ्या कल्पना मांडण्यात आल्या. अखेर सुवर्णाची मूर्ती यासाठी संमत करण्यात आली. विविध कलाकारांकडून मूर्तीची रेखाटने मागविली गेली. त्यातून सेड्रिक गिबन यांच्या रेखाटनाची निवड केली गेली. या रेखाटनाबरहुकूम जॉर्ज स्टॅनले यांनी मूर्ती बनवली. ही मूर्ती अकादमीच्या कार्यालयात आणली. तिथली माजी ग्रंथपाल व सेक्रेटरी मार्गारेट हॅरिक आश्चर्याने उद्‌गारली, 'अरे, हा तर माझ्या ऑस्कर अंकलसारखा पुतळा दिसतोय !' झाले ! मूर्तीचे बारसे झाले. पुरस्काराचेही बारसे झाले. 'ऑस्कर पुरस्कार' हे नाव अकादमीला अशा रीतीने अनपेक्षितपणे चिकटले. मार्गारेट हॅरिक यांच्या काकांचं भाग्य ! दुसरं काय !

१९२९ साली हा पुरस्कार द्यायला सुरुवात झाली. अजूनही

समारंभास विलक्षण हुरहूर घेऊन हजर असतात. कुठल्या क्षेत्रातील पारितोषिक कुणाला मिळणार ह्याचा किंचितही सुगावा नसतो. विलक्षण जल्लोषात नि दिव्यांच्या झगमगाटात समारंभ सुरू होतो. सीलबंद पाकिटात ऑस्कर विजेत्यांची नावे असलेल्या चिठ्ठ्या असतात. ही पाकिटे हातात घेऊन नामवंत नट व नटचा स्टेजवर येतात. प्रत्येक कलाविभागासाठी नॉमिनेशन झालेल्या पाच चित्रपटांची नावे सांगण्यात येतात. काही चित्रपटातील निवडक प्रसंग पडद्यावर सादर करण्यात येतात. ह्यानंतर तर साऱ्यांच्या उत्सुकता शिगेला पोचलेल्या असतात. कारण नॉमिनेशन केलेल्या ह्या पाचांतून 'ऑस्कर' साठी निवडलेल्या चित्रपटांची व त्या कलाक्षेत्रातील विशिष्ट व्यक्तींची घोषणा स्टेजवर केली जाते. अभिनंदनाच्या टाळ्या, जल्लोष, आनंद ह्यातच पारितोषिक-विजेता प्रकाशाच्या झोतात ऑस्कर स्वीकारण्यासाठी स्टेजवर जातो. अगदी अखेरपर्यंत आपल्याला ऑस्करचा सर्वोच्च बहुमान मिळणार आहे याचा त्याला सुगावाही नसतो.

सर्वोत्कृष्ट चित्रपट, अभिनेता व अभिनेत्री, चित्रपट संपादन, रंगभूषा, वेशभूषा, ध्वनिसंकलन, गीत, चित्रीकरण, पटकथा अशा सर्व तंत्रांतील कलावंतांची, तसेच लघुपट, माहितीपट, विदेशी भाषेतील चित्रपट अशी विविधांगी ऑस्कर पुरस्कारांची निवड ही अशा गमतीदार पद्धतीने होत असते. नॉमिनेशन झालेले पण पुरस्कार न मिळालेले कलावंत निराश होतात. पण जाणकारांनी कस लावून मगच ऑस्करसाठी अखेरची निवड केलेली असते हे प्रत्येकाला ठाऊक असते. त्यामुळे ऑस्करचा मामला वशिल्याचा नाही. आपण कुठेतरी कमी पडतो ही जाणीव कलावंताजवळ असते. ऑस्कर नाही मिळाले तरी नॉमिनेशनपर्यंत तरी पोहोचलो

ह्या समजुतीने कलावंत निराशेतही थोडासा सुखावून राहतो.

भारताने 'मदर इंडिया' हा चित्रपट ऑस्कर पुरस्कारासाठी पाठविला होता. दुर्दैवाने पारितोषिक मिळालं नाही. तथापि नॉमिनेशनपर्यंत त्याने धडक मारली होती हे काही थोडकं नाही.

ऑस्कर मिळालेल्या चित्रपटांच्या दर्जाचे शिक्कामोर्तब झाल्यासारखे होते. त्यांना मागणी वाढते. अर्थातच लक्षावधी रुपयांनी त्यांची कमाई वाढते. नाव मिळाले की पैसाही मिळून जातो. कलावंतांचे भाव वधारतात. त्यांना पुढील चित्रपटात पटापट कामे मिळून जातात. पैसाही तसाच मिळतो.

'गांधी' चित्रपटाने १९८३ मधील आठ कलाविभागांतील आठ ऑस्कर पुरस्कार मिळविले. पण १९५९ साली 'बेनहर' ह्या चित्रपटाने अकरा ऑस्कर मिळवून उच्चांक केलेला आहे.

भल्याभल्या कलावंतांनी ऑस्करचा बहुमान मिळावा म्हणून जीव टाकला, पण ऑस्करची हेटाळणी करून ते नाकारणारे महाभागही निघाले. जॉर्ज स्कॉट यांना १९७१ मध्ये 'पॅटन' चित्रपटासाठी हा बहुमान मिळाला होता. वुडी ॲलन ह्यालाही 'ॲनी हॉल' ह्या चित्रपटाने बहुमान मिळवून दिला होता. पण दोघांनीही ऑस्कर स्वीकारले नाही.

याउलट रिचर्ड बर्टनची स्थिती. सात वेळा नॉमिनेशन होऊन एकदाही ऑस्कर त्याच्या पदरात पडले नाही.

वॉल्ट डिस्नेने आजवर सतरा वेळा ऑस्कर पुरस्कार पटकावले आहेत. एकट्याने इतके वेळा बहुमान पटकावण्याचा हा एक उच्चांक आहे.

'वेस्ट साइड स्टोरी' (१९६१) व 'गॉन वुइथ द विंड' (१९३९) ह्या चित्रपटांनी प्रत्येकी दहा दहा ऑस्कर मिळविले

होते.

चित्रपट क्षेत्रातील 'नोबेल पारितोषिका' ची ऑस्करची ही कहाणी ऐकतानाच अशी रोमहर्षक वाटते. १९८३ साल उजाडतं. झगमगणाऱ्या हॉलमध्ये समारंभ चाललाय. स्टार, सुपरस्टार, जमलेत. बंद पाकिटं बघून कलावंतांची हुरहूर वाढतेय. आणि एकदा, दोनदा, तीनदा. . तब्बल आठ वेळा 'गांधी' चं नाव पुकारलं जातं. 'गांधी' हा महात्मा, भारतीय जीवनतत्त्वाचा आत्मा ! त्यांच्या तत्त्वाचा आविष्कार वीस वर्षांच्या अविश्रांत परिश्रमाने ॲटेनबरो यांनी चित्ररूपाने जगाच्या कानाकोपऱ्यात पोचविला. आठ ऑस्कर दिल्याने खुद्द ऑस्कर पुरस्काराचाही बहुमान झालेला आहे. बंद पाकिटातून वेशभूषेसाठी भानुमती अथैय्या यांच्या नावाची घोषणा होतेय. प्रकाशझोतात त्या 'ऑस्कर' स्वीकारण्यासाठी पुढे जातात.

एकंदर ऑस्कर पुरस्कारांच्या कथेत भारताचे नाव एकदाच आढळून येते. भारतातील... महाराष्ट्रातील आणि त्यातून कोल्हापुरातील एका महिलेने प्रथमच ऑस्कर पटकावले. १९८३ साल आठवणीत राहावं असं आहे. पुढे जाऊन भारतात कोण ऑस्कर घेतंय, त्याची वाट पाहायचीय.

१९८५ मध्ये 'ॲमेडचूज' ह्या चित्रपटानेही आठ ऑस्कर पुरस्कार घेतले आहेत. १९८४ साली मात्र 'टर्मस् ऑफ इंडिअरमेंट' या चित्रपटाने ५ ऑस्कर मिळविली होती.

## १९८६ मधील काही ऑस्कर पुरस्कार

*　　　　　　　　　　　　　　　　　　*

सर्वोत्कृष्ट चित्रपट :
सर्वोत्कृष्ट दिग्दर्शन :
सर्वोत्कृष्ट ध्वनिमुद्रण :
} 'प्लॅटून' (व्हिएतनाम युद्धावर आधारित चित्रपट)

सर्वोत्कृष्ट चित्रपट संकलन :

सर्वोत्कृष्ट अभिनय : पॉल न्यूमन

सर्वोत्कृष्ट अभिनेत्री : मार्ली मॅटलिन

सर्वोत्कृष्ट पटकथा : वूडो ॲलन

(पुरस्कार वितरण सोहळा ३० मार्च १९८७ रोजी साजरा झाला.)

## कलिंग पुरस्कार

'कलिंग' हा शब्द वाचल्याबरोबर आपल्या डोळ्यासमोर प्राचीन इतिहास उभा राहतो. पौराणिक आणि ऐतिहासिक स्मृती चाळविल्या जातात. कलिंगच्या सांस्कृतिक समृद्ध परंपरेची आठवण होते. 'कलिंग' या शब्दाचे हे सामर्थ्य आहे असे म्हणावे लागेल. म्हणूनच कलिंग पुरस्काराची माहिती करून घेत असताना कलिंगचा पौराणिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक मागोवा घेतला तर आपल्या ज्ञानात भरच पडणार आहे.

बलिराजाची राणी सुषेणा हिला दीर्घतमा ऋषीपासून पाच पुत्र झाले. त्यातील एकाचे नाव कलिंग असे होते. त्याने स्वतःच्या नावे राज्य स्थापले. तेच हे कलिंग राज्य होय.

कर्ण व श्रीकृष्ण यांनी या प्रदेशावर स्वारी केली होती. दुर्योधनाने इथल्या चित्रांगद राजाच्या मुलीशी विवाह केला होता. भारतीय युद्धात कलिंगराजा आपल्या गजदलासह कौरवांच्या बाजूने लढला होता. हे झाले पौराणिक संदर्भ.

गुंफा, गणेशगुंफा व हाथीगुंफा, परमेश्वराचे मंदिर, कोनार्कचे सूर्यमंदिर या आणि अशा अनेक वास्तुशिल्पांवरून कलिंगची समृद्ध कलापरंपरा दिसून येते. कलिंग नृपतींच्या वैभवाची ही साक्षच आहे. कलिंगचा इतिहास आणि संस्कृतिदर्शक यासंबंधी हे काही संदर्भ.

असा हा कलिंग म्हणजे सध्याचे ओरिसा राज्य होय. गंगेच्या मुखापासून गोदावरीच्या मुखापर्यंतच्या पूर्वकिनाऱ्याचा यात समावेश होतो. समृद्ध शेती, वने-उपवने, निसर्गाने नटलेला असा हा प्रदेश आहे. जंगली हत्तींविषयी कलिंग आजही प्रसिद्ध आहे.

'कलिंग' हा शब्द पुराण, इतिहास, भूगोल या साऱ्यांचा एक-समयावच्छेदेकरून ठसा उमटून जावा असे संदर्भ घेऊन आपल्या-पुढे उभारतो. त्यातूनही सम्राट अशोकाचा युद्धात विजय झाला. पण अपरिमित हानी झालेली पाहून त्याचे मतपरिवर्तन झाले. युद्धातून मानवतावादाकडे त्याची ही जी वाटचाल झाली त्याचे महत्त्व लक्षात घेऊन, युद्धापेक्षा मानवतावादी दृष्टिकोन महत्त्वाचा आहे हे पुढच्या पिढ्यांच्या मनावर बिंबवावे हा हेतू दृष्टीसमोर ठेवून श्री. बिजू पटनाईक यांनी 'कलिंग पुरस्कार' सुरू केला. अशोकाच्या वेळी लक्षावधी संख्येत चतुरंग सेना होती. आजच्या विज्ञानयुगात अणुशस्त्रे, रॉकेटसारखी भयंकर अस्त्रे राष्ट्राराष्ट्रा-तील युद्धासाठी सज्ज आहेत. विज्ञानामुळे जीवनात सुखसोयी वाढत आहेत. विज्ञानामुळे मानवीसंहारक अस्त्रेही मोठ्या प्रमाणा-वर निर्मिली जात आहेत. या अस्त्रांचा युद्धासाठी उपयोग करून भयंकर मानवी संहार झाल्यावर सम्राट अशोकासारखा पश्चात्ताप करीत बसणे योग्य होणार नाही. यासाठी वेळीच सावध होऊन विज्ञानाचा मानवी सुखसोयींकरिता उपयोग व्हावा, विज्ञानाकडे

पाहण्याची दृष्टी मानवतावादी असावी, ही 'कलिंग पुरस्कारा'-मागील खरी भूमिका आहे.

'कलिंग पुरस्कार' सुरू करणारे श्री. बिजू पटनाईक भारत-पाकिस्तान युद्धात काश्मीरमध्ये विमान उतरविणारे पहिले धाडशी भारतीय वैमानिक होत.

पटनाईक यांनी ओरिसात 'कलिंग विमानसेवा' सुरू केली. त्याचबरोबर उद्योगक्षेत्रातही त्यांनी शिरकाव केला.

१९५२ पासून त्यांनी राजकारणात सक्रीय भाग घेऊन विधान-सभा निवडणुकीत विजय मिळविला. प्रगती पार्टीचे ते नेते होते. ओरिसा मुख्यमंत्रीपदाची धुराही त्यांनी सांभाळली. लोकसभा-सदस्य, केंद्रीय खाण व पोलादमंत्री, ओरिसा नियोजन मंडळाचे अध्यक्ष अशा महत्त्वाच्या पदांवर त्यांनी कार्य केले. 'कलिंग फौंडेशन ट्रस्ट'ची त्यांनी स्थापना केली. शिक्षण, विज्ञान आणि संस्कृती यांच्या विकासासाठी, जागतिक पातळीवर कार्य करणाऱ्या व यूनोच्या अंतर्गत असणाऱ्या 'युनेस्को' या संस्थेद्वारा दरवर्षी 'कलिंग पुरस्कार' देण्याची योजना 'कलिंग फौंडेशन ट्रस्ट'ने आखली. त्यानुसार १९५२ पासून दरवर्षी हा जागतिक पुरस्कार देण्यात येऊ लागला.

विज्ञानक्षेत्रातील श्रेष्ठ जागतिक पुरस्कार म्हणून 'कलिंग पुरस्कार' ओळखला जातो. हा पुरस्कार मिळविलेल्यात अनेक शास्त्रज्ञ, संशोधक, विज्ञानविषयक लेखन करणारे लेखक, पत्रकार आणि शिक्षणतज्ज्ञ यांचा समावेश आहे. १९६३ मध्ये श्री. जग-जितसिंग या भारतीय शास्त्रज्ञाला हा पुरस्कार देण्यात आला. त्यानंतर मात्र आजपर्यंत भारताला हा पुरस्कार मिळालेला नाही.

जागतिक विज्ञानक्षेत्रातील थोर शास्त्रज्ञ, लेखक, शिक्षणतज्ज्ञ यांचे आणि भारताचे परस्परसंबंध दृढ व्हावेत अशी प्रेरणा असणारा हा कलिंग पुरस्कार रोख एक हजार पौंड स्टर्लिंगचा आहे. याशिवाय, पुरस्कारित व्यक्तीला 'युनेस्को' या संस्थेमार्फत सुवर्णपदक आणि भारतभेटीचे निमंत्रण देण्यात येते. एकापरीने हा त्या राष्ट्राचा सन्मानच असतो. त्यामुळे भारत व पुरस्कारित देश यांचे संबंध अधिक दृढ होण्यासही मदत होते.

'युनेस्को' या संस्थेच्या कचेऱ्या बहुतेक सर्व देशातून आहेत. या कचेऱ्यांकडून विज्ञानक्षेत्रात मानवतावादी दृष्टिकोन स्वीकारून उच्च पातळीवर कोण कार्य करीत आहे त्याची नावनिशीवार माहितीपत्रके मागविली जातात. जगाच्या कानाकोपऱ्यातून ही माहितीपत्रके 'युनेस्को'च्या मध्यवर्ती कार्यालयात एकत्र करण्यात येतात. तीन आंतरराष्ट्रीय सभासदांचे मंडळ या माहितीपत्रकांची छाननी करण्यासाठी व एका नावाची शिफारस करण्यासाठी नेमण्यात येते. या मंडळाची नेमणूक युनेस्कोच्या मुख्य सचिवांकडून होत असते. मंडळाच्या शिफारशीनंतर 'कलिंग पुरस्कार' देण्यात यावयाच्या व्यक्तीच्या नावावर शिक्कामोर्तब होऊन, युनेस्कोकडून तशी घोषणा करण्यात येते.

१९५२ ला प्रथमच कलिंग पुरस्कार देण्यात आला. त्याचे मानकरी फ्रान्सचे शास्त्रज्ञ ल्वी द ब्रॉगली होत.

मानवतावादी दृष्टिकोनातून शास्त्रीय विषयावर लिखाण करणारे थोर विचारवंत बर्ट्रंड रसेल यांना १९५७ साली 'कलिंग पुरस्कार' देण्यात आला.

१९६३ सालचा पुरस्कार भारतीय वैज्ञानिक श्री. जगजितसिंग यांनी पटकावून पारितोषिक देणारा भारत विज्ञानातही आघाडी-

त्यात सातत्य आहे, नाविन्य आहे, शान आहे, सर्वोच्च बहुमान आहे. पहिल्या वर्षी १९२७–२८ सालातील उत्कृष्ट चित्रपट, उत्कृष्ट दिग्दर्शक, उत्कृष्ट अभिनेता व अभिनेत्री अशा एकूण अकरा वेगवेगळ्या कलाविभागांना हा पुरस्कार देण्यात आला.

त्यानंतर दरवर्षी चित्रपटांची वेगवेगळी अंगे पुरस्कारासाठी विचारात घेण्यात येऊ लागली. आज १८ ते २० पुरस्कारात लघुपट, माहितीपट, विदेशी भाषिक चित्रपट यांसाठी वेगळे पुरस्कार देण्यात येतात. प्रदीर्घ कलासेवेबद्दल सन्माननीय ऑस्कर पुरस्कारही एखाद्या कलावंताला मिळून जातो.

अकादमी स्थापनेच्या वेळी अवघे चौतीस सभासद होते. आज ही संख्या शंभर पटींनी वाढली आहे. जवळजवळ चौतीसशे सभासद संस्थेत आहेत. यात चित्रपटक्षेत्रात नाव कमावलेली व बरेचजण ऑस्कर मिळविलेली मातबर मंडळी आहेत.

पुरस्कार देण्याची पद्धत अगदी निर्दोष व गमतीदार आहे. जगातील उत्कृष्ट व निवडक असे चित्रपट ऑस्कर पुरस्कार मिळविण्यासाठी दाखल होतात. हे सर्व चित्रपट अकादमीचे सभासद पाहतात. प्रत्येक कलाक्षेत्रासाठी प्रत्येकी पाच चित्रपटांची निवड केली जाते. त्याला नॉमिनेशन म्हणतात. ऑस्करसाठी नॉमिनेशन होणे हीसुद्धा एक प्रतिष्ठेची बाब मानली जाते. कारण त्या त्या कलाक्षेत्रातील जाणकार सभासदांकडून ही निवड केलेली असते. नॉमिनेशन झालेल्या या पाच चित्रपटांतून एका चित्रपटाची निवड पुरस्कारासाठी केली जाते. मात्र हे सारे काम अत्यंत गुप्ततेने होत असते. ऑस्कर पारितोषिक वितरण समारंभ मोठ्या झगमगाटात चालू होतो. हॉलिवूडप्रमाणे कानाकोपऱ्यातून पुरस्कारासाठी आलेल्या चित्रपटांचे सारे मातबर कलावंत ह्या

वर आहे हे दाखवून दिले.

विज्ञान आणि मानवता यांची सांगड घालण्याच्या उद्देशाने ओरिसाचे माजी मुख्यमंत्री आणि थोर उद्योगपती श्री. बिजू पटनाईक यांनी सुरुवात केलेल्या 'कलिंग पुरस्काराची' त्याचबरोबर कलिंगच्या इतिहासाची ही थोडीशी झलक आहे.

* *

अगदी अलीकडचा म्हणजे १९८६ चा कलिंग पुरस्कार निकोलेक बॅसोव्ह (सोव्हिएत युनियन) व डॉ. डेव्हिड सुझुकी (कॅनडा) या शास्त्रज्ञांना १५ जानेवारी १९८७ रोजी वहाल करण्यात आला आहे.

म. ग्रं. सं. ठाणे, वाङ्मयालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
क्र. २२४८ दिनांक २०।९।८८
विभाग ......बाबा...... क्र. ...........

जागतिक विज्ञानक्षेत्रातील थोर शास्त्रज्ञ, लेखक, शिक्षणतज्ज्ञ यांचे आणि भारताचे परस्परसंबंध दृढ व्हावेत अशी प्रेरणा असणारा हा कलिंग पुरस्कार रोख एक हजार पौंड स्टर्लिंगचा आहे. याशिवाय, पुरस्कारित व्यक्तीला 'युनेस्को' या संस्थेमार्फत सुवर्णपदक आणि भारतभेटीचे निमंत्रण देण्यात येते. एकापरीने हा त्या राष्ट्राचा सन्मानच असतो. त्यामुळे भारत व पुरस्कारित देश यांचे संबंध अधिक दृढ होण्यासही मदत होते.

'युनेस्को' या संस्थेच्या कचेऱ्या बहुतेक सर्व देशातून आहेत. या कचेऱ्यांकडून विज्ञानक्षेत्रात मानवतावादी दृष्टिकोन स्वीकारून उच्च पातळीवर कोण कार्य करीत आहे त्याची नावनिशीवार माहितीपत्रके मागविली जातात. जगाच्या कानाकोपऱ्यातून ही माहितीपत्रके 'युनेस्को'च्या मध्यवर्ती कार्यालयात एकत्र करण्यात येतात. तीन आंतरराष्ट्रीय सभासदांचे मंडळ या माहितीपत्रकांची छाननी करण्यासाठी व एका नावाची शिफारस करण्यासाठी नेमण्यात येते. या मंडळाची नेमणूक युनेस्कोच्या मुख्य सचिवांकडून होत असते. मंडळाच्या शिफारशीनंतर 'कलिंग पुरस्कार' देण्यात यावयाच्या व्यक्तीच्या नावावर शिक्कामोर्तब होऊन, युनेस्कोकडून तशी घोषणा करण्यात येते.

१९५२ ला प्रथमच कलिंग पुरस्कार देण्यात आला. त्याचे मानकरी फ्रान्सचे शास्त्रज्ञ ल्वी द ब्रॉगली होत.

मानवतावादी दृष्टिकोनातून शास्त्रीय विषयावर लिखाण करणारे थोर विचारवंत बर्ट्रँड रसेल यांना १९५७ साली 'कलिंग पुरस्कार' देण्यात आला.

१९६३ सालचा पुरस्कार भारतीय वैज्ञानिक श्री. जगजितसिंग यांनी पटकावून पारितोषिक देणारा भारत विज्ञानातही आघाडी-

वर आहे हे दाखवून दिले.

विज्ञान आणि मानवता यांची सांगड घालण्याच्या उद्देशाने ओरिसाचे माजी मुख्यमंत्री आणि थोर उद्योगपती श्री. बिजू पटनाईक यांनी सुरुवात केलेल्या 'कलिंग पुरस्काराची' त्याचबरोबर कलिंगच्या इतिहासाची ही थोडीशी झलक आहे.

* *

अगदी अलीकडचा म्हणजे १९८६ चा कलिंग पुरस्कार निकोलेक बॅसोव्ह (सोव्हिएत युनियन) व डॉ. डेव्हिड सुझुकी (कॅनडा) या शास्त्रज्ञांना १५ जानेवारी १९८७ रोजी बहाल करण्यात आला आहे.

म. सा. सं. ग्रंथालय
बाल वाङ्मय विभाग
क्र. २२४८८ दिनांक २०।५।८८
विषय बाल



स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान स्वर्गीय पं. जवाहरलाल नेहरू यांचे नाव माहीत नाही असा एकही आबालवृद्ध सापडणार नाही. तुम्ही मुले ' नेहरू चाचा ' म्हणून त्यांना ओळखता. ' मुले ही राष्ट्राची फुले ' असे ते म्हणत. मुलांप्रमाणे राष्ट्रावरही त्यांनी असेच प्रेम केले. आपल्या देशाप्रमाणे शेजारी राष्ट्रांत आणि एकंदर जगातच शांतता नांदावी असे त्यांना नेहमी वाटे. स्वातंत्र्यपूर्वकाळात आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतर हा महामानव मानवता, सामंजस्य आणि शांतता यांसाठी अखंड कार्य करीत राहिला. भारतमातेचा हा लाडका सुपुत्र साऱ्या जगालाही तितकाच प्रिय होता. शांतिदूत म्हणून सारे जग त्यांना ओळखते.

' भारतीय जनतेने माझ्यावर एवढे प्रेम केले आहे की, त्या प्रेमाची परतफेड अल्पांशानेही करणे अशक्य आहे ! ' असे म्हणणारे पंडितजी आयुष्याच्या अखेरपर्यंत देशसेवा करीत राहिले.

स्वातंत्र्य मिळाल्यावर १५ ऑगस्ट १९४७ पासून जीवनाच्या अखेरपर्यंत म्हणजे २७ मे १९६४ अखेरपर्यंत पंतप्रधान म्हणून त्यांनी भारतीय जनतेची सेवा केली. स्वतंत्र भारताची जडण-घडण करीत असतानाच स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि शांतता या मूल्यांची जोपासना होऊन राष्ट्राराष्ट्रातील संबंध सुधारावेत, तंटे आणि युद्धे मिटावीत म्हणून पंडितजींनी यूनोद्वारा सतत प्रयत्न केले. पंचशील तत्त्वे, विविध देशांना भेटी, मानवतावादाचा सतत पाठपुरावा केला. त्यामुळे रशिया, अमेरिका यांसारखे बडे देश भारताच्या सहकार्यासाठी सदैव आघाडीवर राहिले. मानवता व शांततावाद यामुळे त्यांनी यूनोची प्रतिष्ठा वाढविण्याचा प्रयत्न केला.

एक मुत्सद्दी राजकारणी नेता, उत्तम वक्ता व लेखक, इतिहासतज्ज्ञ, विज्ञाननिष्ठ, आदर्श प्रशासक, अजातशत्रू व शांततेसाठी झटणारा शांतिदूत म्हणून जगातील कानाकोपऱ्यात पंडितजी सर्वप्रिय होते. नेहरूचाचा म्हणून बालकांतही त्यांची तितकीच लोकप्रियता होती.

अशा ह्या अजातशत्रूच्या कार्याचे चिरंतन स्मारक व्हावे ह्या उद्देशाने भारत सरकारने त्यांच्या पश्चात १९६४ पासून ' नेहरू पुरस्कार ' सुरू केला आहे. आंतरराष्ट्रीय सामंजस्य, सदिच्छा व स्नेहसंवर्धन यासाठी जागतिक पातळीवर दिला जाणारा हा पुरस्कार आहे.

' नेहरू पुरस्कार ' हा वार्षिक पुरस्कार आहे. नेहरूंची आंतरराष्ट्रीय शांतता, सलोखा व सदिच्छेची चाड राखून अविरत सेवा करणाऱ्या मान्यवर व्यक्तीची निवड या पुरस्कारासाठी होत

असते. मग ही व्यक्ती जगातील कुठल्याही देशातील असो, राजकीय, सामाजिक अशा कुठल्याही क्षेत्रात कार्य करीत असो. निकष असतो आंतरराष्ट्रीय स्नेहवर्धन, सदिच्छा, निरपेक्ष व निरलस सेवा यांचा. आणि आपल्याला माहिती आहेच की, सर्वेत्र सुखिनः सन्तु । सर्वे सन्तु निरामयः ।। ह्या जाणिवेतून कार्य करणारी व्यक्ती व्यक्तिगत स्वार्थाचे सारे पाश तोडून संत पदवीपर्यंत तेव्हाच पोहचलेली असते. दरवर्षी जगाचा कानाकोपरा धुंडाळून अनेकांतून एक नेमकी अशी महान व्यक्ती शोधून काढून 'नेहरू पुरस्कारा'ने सन्मानित करायची, हे कार्य पुरस्कार समितीला करावे लागते. निवड समितीचे हे कार्य कठीण आणि तितकेच जोखमीचे असते.

'नेहरू पुरस्कार' देण्यात यावयाच्या व्यक्तीची निवड करण्यासाठी सात जणांची निवड समिती आहे. या निवड समितीचे अध्यक्ष भारताचे उपराष्ट्रपती आहेत. संस्थेचे सचिव हे या समितीचेही सचिव असतात. याशिवाय सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश, भारतीय विद्यापीठाचे एक कुलगुरू, मान्यवर भारतीय वृत्तसंघाचा एक प्रतिनिधी आणि सार्वजनिक जीवनातील दोन मान्यवर व्यक्ती अशा सर्व क्षेत्रांतील व सर्वमान्य सन्माननीयांचे हे परीक्षण मंडळ असते. यातील उपराष्ट्रपती व सरन्यायाधीश हे या मंडळाचे कायम पदसिद्ध अधिकारी असतात. मंडळापुढे आलेल्या नावातून एकाच व्यक्तीची एकमताने निवड करून मग 'नेहरू पुरस्कारा'ची घोषणा करण्यात येते.

पुरस्कारासाठी निवड झालेल्या व्यक्तीला एक लाख रुपये रोख व मानपत्र देऊन त्याचा व त्याच्या कार्याचा गौरव करण्यात येतो. कार्य आणि कर्तृत्व या दोन्हींमुळे ही व्यक्ती जागतिक

पातळीवर प्रसिद्ध असतेच. नेहरू पुरस्कारामुळे सोन्याला सुगंध लाभल्यागत पुरस्कारित व्यक्तीच्या कर्तृत्वावर आणखीन एकदा शिक्कामोर्तब होऊन जाते.

नेहरू पुरस्कारासाठी १९६४ साली समितीचे कामकाज सुरू झाले. १९६५ साली पहिला पुरस्कार जाहीर झाला. यू थांट हे नेहरू पुरस्काराचे पहिले मानकरी ठरले. यूनोच्या सहकार्यवाहपदी असताना युद्ध व राष्ट्राराष्ट्रातील तंटे मिटवून जागतिक शांततेसाठी त्यांनी अविस्मरणीय कार्य केले.

त्यानंतरचा १९६६ चा पुरस्कार मार्टिन ल्यूथर किंग (ज्यु.) यांना देण्यात आला. अमेरिकेतील काळचा लोकांना शांततापूर्ण लढ्याने सामाजिक हक्क मिळवून देण्यासाठी किंग (ज्युनियर) अव्याहतपणे झटले. धरणे, सत्याग्रह, निदर्शने यांमुळे त्यांना अनेक वेळा तुरुंगवास पत्करावा लागला. गोऱ्या लोकांच्या दगडफेकीला नि प्रसंगी बॉंबहल्ल्यालाही तोंड द्यावे लागले. मार्टिन म्हणजे 'अमेरिकेचे गांधी' व श्रेष्ठ विचारवंत म्हणून गणले जात होते. 'टाइम' ह्या वृत्तपत्राने त्यांना 'महामानव' हा पुरस्कार बहाल केला. पाठोपाठ १९६४ साली शांततेचे 'नोबेल पारितोषिक' त्यांना देण्यात आले. 'नेहरू पुरस्कारा'ने किंग यांचा गौरव झालाच, पण पुरस्काराची शानही वाढली.

भारतात वास्तव्य करून अविरत मानवी सेवेत जीवन व्यतीत करीत असलेल्या मदर तेरेसांना १९६९ चा 'नेहरू पुरस्कार' देण्यात आला. निरलस मानवी सेवेबद्दल मदर तेरेसांचे जागतिक पातळीवरील 'नोबेल' पासून 'भारतरत्न' पर्यंत चाळीसवर सन्मान झालेले आहेत. 'सर्वे सन्तु निरामय:' ह्या सर्वोच्च मानवी कल्याणाच्या जाणिवेतून त्यांचे कार्य अविरतपणे चालूच आहे.

यहुदी मेनुईन, मार्शल टिटो, आंद्रे मालरो, ज्युलिअस नेरेरे, तुलसी श्रेष्ठ, अशी नेहरू-पुरस्कार लाभलेल्या थोर व्यक्तींची काही नावे. यांत काही देशांचे पंतप्रधानही आहेत. १९८३ पर्यन्त १ लाख रुपये पुरस्कार होता. १९८४ पासून पुरस्काराच्या रक-मेत वाढ करण्यात आली असून ती अडीच लाख रुपये करण्यात आली आहे. १९८४ चा पुरस्कार स्वर्गीय पंतप्रधान इंदिरा गांधी यांना मरणोत्तर देण्यात आला असून (२॥ लाख रुपये) पंतप्रधान राजीव गांधी यांनी त्याचा स्वीकार केला. इंदिराजींनी आपली हयात देशाच्या सेवेसाठी खर्च केली. रक्ताचा शेवटचा थेंब असे-पर्यन्त मातृभूमीची सेवा करण्याचा संकल्प मृत्यूपूर्वी आठच दिवस आधी त्यांनी बोलून दाखविला होता. आपल्या पित्याच्या स्मृति-प्रीत्यर्थ ठेवलेला पुरस्कार कन्येने मरणोत्तर म्हणून मिळवावा हा एक विचित्र योगायोग आहे. १९८५ चा पुरस्कार स्वीडनचे पंत-प्रधान ओलफ पामे यांना मरणोत्तर देण्यात आला. यावेळी ह्या पुरस्काराचे मूल्य १५ लाख रुपये होते.

पुरस्कार आणि सन्मान हे ज्यांच्या नावे दिले जातात त्यांची प्रतिष्ठा आणि कार्य तितकेच मोलाचे असावे लागते. ज्योतीने तेजाची आरती करावी तशातलाच हा प्रकार असतो. नेहरू पुर-स्काराने ही प्रतिष्ठा आणि शान समर्थपणे राखली आहे, एवढे खरे. पंडितजींच्या कार्याचे खरेखुरे चिरंतन स्मारक म्हणजेच ‘ नेहरू पुरस्कार ’ असे म्हणायला काहीच हरकत नाही.

*　　　　　　*

नेहरू पुरस्काराने सन्मानित झालेल्या अलीकडील पाच वर्षातील थोर व्यक्ती–

१९८५ ओलफ पामे (स्वीडिश पंतप्रधान) मरणोत्तर.
१९८४ इंदिरा गांधी (मरणोत्तर)
१९८३ डॉ. ब्रूनो क्रिस्की (ऑस्ट्रिया)
१९८२ डॉ. लिओपोल्ड सेडार सॅगहोर (सेनेगल)
१९८१ गुन्नार मिरडाल व अल्वा मिरडाल (स्वीडन).




## सोविएत नेहरू पुरस्कार

'सोविएत देश नेहरू पुरस्कार' हा तसा राष्ट्रीय पुरस्कार आहे. एक विशिष्ट हेतू नजरेपुढे ठेवून सोविएत लँडकडून स्वर्गीय पंत-प्रधान पंडित नेहरू यांच्या नावे हा पुरस्कार भारतीय कला, साहित्य व समाजसेवी व्यक्तींना बहाल करण्यात येत असतो.

वारली जमातीच्या उन्नतीसाठी जीवन समर्पित केलेल्या श्रीमती गोदावरी परुळेकरांना त्यांच्या या सामाजिक कार्याबद्दल व 'जेव्हा माणूस जागा होतो' या त्यांच्या पुस्तकाबद्दल १९८४ सालचा प्रथम १५००० रु. चा 'सोविएत लँड नेहरू पुरस्कार' बहाल करण्यात आला. त्यांच्याबरोबर संगीत क्षेत्रातील सुप्रसिद्ध सनईवादक बिस्मिल्ला खाँ व कथ्थक नर्तक बिरजू महाराज यांनाही कला क्षेत्रातील १९८४ चा नेहरू पुरस्कार देण्यात आला

आहे. ‘ हिरोशिमा ’ चे लेखक भा. द. खेर आणि श्री. रवींद्र बागडे हे प्रसिद्ध मराठी लेखकही पुरस्कारांच्या यादीत आहेत.

जागतिक शांततेच्या दृष्टीने राष्ट्राराष्ट्रांतील संबंध सलोख्याचे असणे महत्त्वाचे आहे. परस्परात मैत्री ठेवणे, ती वाढविणे आणि टिकविणे यादृष्टीने स्वर्गीय पंतप्रधान नेहरू नेहमीच झटत होते. पंतप्रधान असताना जगातील बहुतेक सर्व देशांना त्यांनी सतत भेटी दिल्या. शांततेचे महत्त्व पटवून द्यायचा प्रयत्न केला. पण पंतप्रधान होण्याआधीही शांततेसाठी ते झटत होते. भारताला मित्रराष्ट्रे मिळवून देण्यासाठी झटत होते. यादृष्टीनेच त्यांनी भारताच्या पारतंत्र्याच्या काळात म्हणजे १९२७ सालीच रशियाला पहिली भेट दिली. रशियन क्रांतीच्या दहाव्या वर्धापन-दिनाचे निमित्ताने ते समारंभास हजर होते. भारत गुलामगिरीत असता रशियासारख्या देशाशी असा मैत्रीपूर्ण संबंध ठेवणे हे आक्षेपार्ह होते. तरीपण नेहरूंनी ते धाडस केले. क्रांतीनंतर लेनिन समाजवादाने रशियात जी झपाट्याने प्रगती केली, त्याचे खरेखुरे चित्र पंडितजींनी भारतीय जनतेपुढे उभे केले.

भारत–रशिया मैत्रीचा हा दुवा दिवसेंदिवस बळकट होत आहे. एवढा की, नुकतेच राकेश शर्मासारख्या भारतीय अंतराळवीरास ‘ सोविएत संघाचा वीर ’ हा सर्वोच्च किताब दिला गेला. ‘ ऑर्डर ऑफ लेनिन ’ हे पदक आणि पंचकोनी सुवर्णतारापदक असे बहुमान देण्यात आले. त्याचप्रमाणे भारताने राकेश शर्माबरोबर गेलेल्या रशियन अंतराळवीरांना– अनातोली बेरझोव व ग्रेचको– ‘ कीर्तिचक्र ’ हा सेनादलातील सर्वोच्च पुरस्कार बहाल केला. भारताबाहेरील वीरांना हा पुरस्कार खास समारंभात व प्रथमच देण्यात येत आहे. या बहुमानाचा रशिया हा पहिला मानकरी

आहे. यातच मैत्रीची दृढता किती आहे हे कळून येते.

रशियन सरकारने पंडितजींचा नेहमीच आदर केला आहे. साऱ्या जगाने त्यांना शांतिदूत मानले होते. रशिया तर परस्परातील शांतीचे आणि स्नेहाचे संबंध दृढ व्हावेत यासाठी सदैव झटत होता. वैचारिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक देवाण-घेवाण यामुळे सामान्य लोक अधिक जवळ येत असतात, हे सोविएत सरकारने जाणले. या साहित्य, संस्कृती आणि विचारांच्या विनिमयास अधिक जोर यावा, भारतीय लोक या चळवळीकडे आकर्षिले जावेत आणि पंडितजींचा आदर चिरस्मृतीने राखला जावा, हे सर्व जाणून 'सोविएत देश नेहरू पुरस्कार' सुरू करण्यात आला.

पंडितजींच्या मृत्यूनंतर थोड्याच दिवसात 'सोविएत मासिकातर्फे' एक निधी उभारण्यात आला. 'सोविएत–भारत मैत्री निधी' असे या निधीचे नाव. या निधीतून दरवर्षी सोविएत देश नेहरू पुरस्कार देण्यात येतो.

कला व साहित्य, पत्रकारिता, रशियन भाषेतील साहित्याची विविध भारतीय भाषांत भाषांतरे, भारत–सोविएत मैत्री दृढ करण्यासाठी विशेष कार्य, यांसाठी ३ स्तरांवर हे पुरस्कार दिले जातात. याशिवाय १० ते १३ वयोगटातील ५ बालकांना पेंटिंग किंवा निबंध यासाठी वेगळे पुरस्कार देण्याची योजनाही आहे.

पहिल्या विभागात प्रत्येकी १५००० रुपये रोख, दोन आठवड्यांची सोविएतची सफर आणि मानपत्र असे ३ पुरस्कार आहेत. दुसऱ्या विभागात प्रत्येकी सात हजार पाचशे रुपये रोख, दोन आठवड्यांची सोविएतची सफर आणि मानपत्र असे ३ पुरस्कार दिले जातात. तिसऱ्या विभागाला तीन हजार रुपये रोख

व मानपत्र देण्यात येते. लहान मुलांच्या चित्रस्पर्धेतील पहिल्या पाच मुलांना सोविएत रशियाची एक महिन्याची मौजमजा करण्याची संधी प्राप्त करून देण्यात येते.

वरील पुरस्कारांशिवाय बहुतेक प्रत्येक वर्षी प्रत्येक विभागासाठी अतिरिक्त पुरस्कारही जाहीर केले जातात.

पुरस्कार निवडीसाठी चौदा जणांची समिती नेमण्यात आली आहे. भारत व सोविएतमधील विद्वान साहित्यिक, समीक्षक, संपादक, पत्रकार, तसेच समाजातील आदरणीय व्यक्तींचा तीत समावेश असतो. या समितीमधील चार सभासद विभागीय भाषासमितीचे चेअरमन म्हणून काम पाहतात.

विभागीय भाषासमित्या चार विभागात काम करतात. सर्व भारतीय भाषांचे विभाजन या चार भागात केले आहे. चेअरमन आणि व्हाईस-चेअरमन याशिवाय त्या विभागांतर्गत येणाऱ्या प्रत्येक भारतीय भाषेसाठी तज्ज्ञ साहित्यिक, समीक्षक यांचा अंतर्भाव असतो. चौदा भाषांचा या चारही विभागांत समावेश केला आहे. दरवर्षी जूनअखेर आलेले साहित्य, पेंटिंग इ. चाच पुरस्कारासाठी विचार केला जातो. सल्लागार समितीने शिफारस केल्यावर अंतिम निवड मध्यवर्ती समितीत होते व त्यानंतर नेहरू पुरस्कार विजेत्यांची नावे प्रसिद्ध करण्यात येतात.

१९६५ साली हा पुरस्कार सुरू झाला. त्या वेळी साहित्यातील प्रथम पुरस्कार प्रसिद्ध हिंदी कवी सुमित्रानंदन पंत यांना मिळाला होता.

चार भाषाविभागांपैकी पश्चिम विभागात मराठी भाषा येते.


१९८३ सालच्या पुरस्कारात भाषांतरासाठी असलेले प्रत्येकी ३००० रु. रोख व मानपत्र या विभागातील दोन पुरस्कार मराठी

भाषेने मिळविले आहेत. श्रीमती मीनाक्षी कोल्हटकर यांच्या 'गॉर्की कॉलनी' या कादंबरीला आणि डॉ. व्ही. एस. जोग यांच्या 'मार्क्सवाद आणि मराठी साहित्य' या ग्रंथास पुरस्कार देण्यात आला.

१९६५ पासून १९८६ पर्यंतचा कालखंड पाहता अनेक मराठी साहित्यिक नेहरू पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत. पां. वा. गाडगीळ, प्रभाकर ऊर्ध्वरेषे, विंदा करंदीकर, दि. के. बेडेकर, अनंत काणेकर, सदानंद रेगे, नारायण सुर्वे, अ. ना. पेडणेकर अशी कितीतरी नावे देता येतील. धों. वे. जोगी यांचे नावाची १९८५ मध्ये, तर ॲड. धैर्यशील पाटील यांची १९८६ मध्ये त्यात भर पडली आहे. १९८७ चे प्रथम पुरस्कार माजी राजनीतीज्ञ पी. एन. हक्सर, आर. के. नारायण व डॉ. के. एम. जॉर्ज (दोन्ही लेखक) अशा तिघांना मिळाली आहेत.

दरवर्षी नेहरू जयंतीला पुरस्कार वितरणाचा हा सोहळा साजरा होत असतो. १९८३ साली मुख्य पाहुणे होते पंडितजींचे नातू व आजचे आपले पंतप्रधान मा. राजीव गांधी. १९८४ च्या समारंभास उपराष्ट्रपती वेंकटरामन यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आले.

१९६५ पासून सुरू झालेल्या 'सोविएत देश नेहरू पुरस्का-रा'ची ही कुळकथा. उभय देशांतील मैत्री-संबंध दृढ होत आहेत त्यात त्या पुरस्कार योजनांचा सिंहाचा वाटा आहे हे नाकारता येणार नाही.




१९८३ चा आंतरराष्ट्रीय 'डेमियन-डटन' पुरस्कार पद्मश्री बाबा आमटे यांना देण्यात आला. कुष्ठरोग्यांच्या सेवेबद्दल सर्वोच्च जागतिक सन्मान म्हणून हा पुरस्कार दरवर्षी देण्यात येतो. १९५३ पासून हा पुरस्कार सुरू झाला. बेल्जियन धर्मगुरू फादर डेमियन आणि त्याचा अमेरिकन सहकारी डटन या दोघांच्या नावे हा पुरस्कार देण्यात येतो. कुष्ठरोगसेवा, पुनर्वसन आणि या क्षेत्रातील तदनुषंगिक कार्य करणारी अमेरिकन 'डेमियन-डटन' ही जागतिक पातळीवरील संस्था दरवर्षी हा पुरस्कार देत असते.

३ जानेवारी १८४० रोजी बेल्जियमच्या एका धर्मशील ग्रामीण कुटुंबात डेमियनचा जन्म झाला. आपल्या बंधूंची धार्मिक आणि सेवाभावी प्रवृत्ती यामुळे डेमियन प्रभावित झाले. त्यामुळे त्यांचा पिंडही सेवाभावी बनत गेला. १८६३ मध्ये हवायन येथे लोकसेवा करण्यासाठी आपल्या बंधूंच्याऐवजी डेमियनना येण्याची सुवर्ण-संधी मिळाली. इथे आल्यावर त्यांनी धर्मगुरूची दीक्षा घेतली आणि तेव्हापासून लोक त्यांना फादर डेमियन म्हणू लागले.

धर्मगुरू आणि सेवाभावी कार्यकर्ता ह्या दोन्ही दृष्टींनी त्यांचे कार्य वाखाणण्याजोगे होते. मोलोकी हे बेट कुष्ठरोग्यांबद्दल तेव्हा प्रसिद्ध होते. जीवनाची अखेरची घटका मोजणारे, तसेच बरे न होणारे कुष्ठरोगी हवायन सरकार मोलोकी बेटावर पाठवीत असे. मोलोकीवर जाणारे हे कुष्ठरोगी म्हणजे समाजापासून कायमचे दूर, काळाच्या उदरात जाणारे अंधारयात्रीच होते. औषधपाणी, मानवसेवा, गोड शब्द, याऐवजी झिजून, सडून, केव्हातरी मरून जाण्याचे दुर्भाग्य या लोकांच्या भाळी होते. मोलोकीला रवानगी म्हणजे एकपरीने कुष्ठरोग्यांना मृत्युदंडाची शिक्षाच होती. फादर डेमियन हे उघड्या डोळ्यांनी पाहात होते. त्यांच्यासारख्या सेवाभावी धर्मगुरूला हे एक आव्हान होते. कुष्ठरोग्यांनी भरलेल्या एका जहाजाकडे बघून त्यांनी हे आव्हान स्वीकारले. 'या लोकांच्या सेवेसाठीच माझे उर्वरित आयुष्य आहे!' असे म्हणून त्यांनी क्षणाचाही विचार न करता या जहाजावर पाऊल ठेवले.

सरकारने आणि समाजाने टाकलेल्या ह्या कुष्ठरोग्यांना फादर डेमियनची सेवा अंकुरागत नवजीवन प्राप्त करून देणारी होती. मानवतेचा परमोच्च बिंदू त्यांना डेमियन यांच्या ठिकाणी दिसत होता. मोलोकीला त्यांनी कुष्ठरोग्यांसाठी शाळा, घरे, वैद्यकीय

सेवाकेंद्रे सुरू केली. ह्या केंद्रांतून कार्यकर्ते निर्माण करण्याचे कार्यही त्यांनी जोमाने सुरू केले.

फादर डेमियन हा हवायनचा सर्वोच्च मानबिंदू होता. त्यांच्या लोकप्रियतेमुळे त्यांचा द्वेष करणारे आणि कार्यात अडथळे आणणारे महाभागही अवतीभोवती वावरत होते. पण कुठल्याही अडचणींना त्यांनी जुमानले नाही. कुष्ठरोग्यांच्या अविरत सेवेमुळे फादर डेमियन यांना कुष्ठरोगाची बाधा झाली. "माझे हात, माझा चेहरा विद्रूप होत चाललाय, पण लोकसेवेसाठी ईश्वराने मला जीवनाच्या अखेरपर्यंत शक्ती आणि सद्‌बुद्धी द्यावी." असे ते सदैव म्हणायचे. कुष्ठरोग्यांची सेवा करता करता स्वतः कुष्ठी होऊन हौतात्म्य पत्करणारा हा धर्मात्मा १५ एप्रिल १८८९ रोजी मरण पावला. 'स्वतत्त्वासाठी मरण पत्करणारा हुतात्मा फादर डेमियन' अशी त्यांच्या मृत्युशिलेवर अक्षरे कोरली आहेत.

त्यांच्या उत्तरायुष्यात कार्यकर्ता म्हणून लाभलेला अमेरिकन सहकारी डटन हाही फादर डेमियन यांच्याप्रमाणे या सेवाक्षेत्रात लोकप्रिय ठरला.

फादर डेमियन यांचा कुष्ठरोग क्षेत्रातील सर्वोच्च आदर्श पुढेही चालू राहावा यासाठी जागतिक पातळीवर कार्य करणारी 'डेमियन-डटन' संस्था आपल्या कार्यातील एक भाग म्हणून कुष्ठरोगसेवेतील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तींचा दरवर्षी सर्वोच्च बहुमान करून त्यांना 'डेमियन-डटन' पुरस्कार देत असते. संशोधन, पुनर्वसन, सामाजिक शिकवणूक आणि वैद्यकीय साहाय्य या साऱ्यांमुळे कुष्ठरोग्यांसंबंधीच्या गैरसमजुती कमी करण्यासाठी या संस्थेने आजवर बरेच कार्य केले आहे. आंतरराष्ट्रीय कुष्ठरोग परिषदा भरवून हे कार्य गतिमान ठेवण्यात येते.

गेल्या वर्षीच्या सुरवातीलाच म्हणजे २० ते २४ फेब्रु. १९८४ या दिवसात ही जागतिक परिषद भारताच्या राजधानीत–दिल्लीत भरली होती. या परिषदेतच बाबा आमटे यांना ' डेमियन-डटन ' पुरस्कार बहाल करण्यात आला.

यावेळच्या पुरस्कारासाठी १९७८ साली मेक्सिकोमध्ये आंतर-राष्ट्रीय पुरस्कार समिती स्थापन करण्यात आली होती. डॉ. मार्गारिट ब्रँड ह्या त्याच्या अध्यक्षा होत्या. नऊ सभासदांच्या या समितीने लंडन, ब्रुसेल्स, अर्जेंटिना, भारत, जपान आणि अमेरिका इत्यादी देशांशी संपर्क ठेवून त्या त्या देशात कुष्ठरोगसेवा करणाऱ्या व्यक्ती व संस्था यांच्या कार्याचे निरीक्षण, मूल्यमापन व गुणवत्ता यांची पारख केली. जागतिक पातळीवर कुष्ठरोगसेवा, पुनर्वसन, वैद्यकीय सेवा अशा सर्वच दृष्टीने बाबा आमटे यांनी गुणवत्ता सिद्ध केलेली असल्याने समितीने १९८३ च्या पुरस्काराचे मानकरी म्हणून त्यांचे नाव जाहीर केले.

पुरस्काराने सन्मानित होणाऱ्या व्यक्तीस सुबक असे सन्मान-पदक देण्यात येते. पॉलिशची अकरा पुटे चढवलेल्या सुंदर लाकडी तक्त्यावर वरच्या बाजूस मधोमध झगझगीत धातूच्या नक्षीदार गोलात डेमियन-डटन यांची कोरीव प्रतिकृती असते. खालच्या भागात मधोमध धातूच्या प्लेटवर मानपत्र खोदलेले असते. आकर्षक व मौल्यवान सन्मानपदक हा कुष्ठरोगसेवेतील सर्वोच्च असा जागतिक सन्मान मानला गेला आहे.

' डेमियन-डटन ' दरवर्षी देण्यात येणारा पुरस्कार असून १९८३ चा ३० वा पुरस्कार बाबांना देण्यात आला. भारताला हा पुरस्कार दुसऱ्यांदा मिळत आहे. १९७० साली डॉ. धर्मेंद्र यांना हाच पुरस्कार बहाल करण्यात आला होता. डॉ. धर्मेंद्र यांच्या मार्ग-

दर्शनाखाली कलकत्त्याच्या ' उष्ण कटिबंधातील रोगांचा अभ्यास करणाऱ्या शिक्षणसंस्थेत ' बाबा आमटे यांनी कुष्ठरोगावरील उपचाराचे शिक्षण पूर्ण केले होते. या क्षेत्रातील थोर शास्त्रज्ञ म्हणून डॉ. धर्मेंद्र यांचा आज जगभर लौकिक आहे. आंतरराष्ट्रीय कुष्ठरोग परिषदेचे १९८४ चे सचिव म्हणून ते काम पाहत आहेत.


१९५३ चा पहिला पुरस्कार अमेरिकेतील ' दि स्टार ' या वृत्तपत्राचे संपादक स्टनले स्टेइन यांना देण्यात आला.

ब्रिटन, अमेरिका, कोरिया, फ्रान्स, मेक्सिको, जपान, फिलिपाइन्स, इत्यादी देशातील शास्त्रज्ञ, संशोधक, वैद्यकीय अधिकारी तसेच कुष्ठरोगनिवारणाकरिता अविरत श्रम घेणाऱ्या अनेक सेवाभावी व्यक्तींची आजवर निवड केली गेली आहे. अमेरिकेचे भूतपूर्व राष्ट्राध्यक्ष जॉन केनेडी यांनाही १९६५ सालचा पुरस्कार बहाल करण्यात आला होता.

१९७० नंतर भारताला दुसऱ्यांदा हा पुरस्कार मिळवून देणारे पद्मश्री बाबा आमटे यांचे कार्यही खरोखरीच थोर आहे. केवळ कुष्ठरोग आणि तदनुषंगिक कार्याचा हा गौरव असला तरी बाबांचे आनंदवनातील एकंदर कार्य पाहिले असता मन आश्चर्यचकित होऊन जाते. कुष्ठरोग्यांप्रमाणे अंध-अपंगांवर उपचार, पुनर्वसन, लघुउद्योग व स्वावलंबन सेवा, गोकुळ (बालकाश्रम), उत्तरायण (वृद्धाश्रम), आधुनिक शेतीपद्धती, त्याचप्रमाणे मुक्तांगण, वनमहोत्सव, आनंदवन मित्रमेळावा, युवाशक्तीला दिशा दर्शविणारे सोमनाथ व अशोकवनासारखे प्रकल्प या साऱ्यातून बाबा आपले विचार आणि कर्तृत्व यांना मूर्तस्वरूप देत आहेत. साऱ्या कुटुंबाची साथ संगतीला घेऊन आणि अंधारयात्रीप्रमाणे जीवनात चाचपडत

चाललेल्या कुष्ठरोग्यांना, तसेच युवाशक्तीला संगतीला घेऊन, बाबा मेलेल्या मनातून जिद्द निर्माण करीत आहेत. ज्ञान आणि विज्ञान यांना वेठीला धरून जीवनाचे अर्थच त्यांनी बदलून टाकले आहेत. आनंदवनात राबणारा प्रत्येक जण श्रमर्षी आहे, असं ते म्हणत असले तरी या श्रमर्षींचे बाबा हे महर्षी आहेत यात शंका नाही. भारतातून नव्हे, तर जगाच्या कानाकोपऱ्यातून त्यांच्या कार्यकर्तृत्वाला दाद मिळत आहे. मान आणि सन्मान, साधने व संपत्ती मिळत आहे. भारत सरकारची पद्मश्री, फाय फौंडेशनचा राष्ट्रभूषण किताब व एक लाखाचा पुरस्कार, १९७९ चा जमनालाल बजाज हा एक लाखाचा पुरस्कार, नागपूर विद्यापीठाची डि. लिट्. ही पदवी, दिवाण पुरस्कार, इंडियन मर्चंटस् चेंबरचा पुरस्कार, कृषिरत्न हा गौरव अशा अनेक गौरवांनंतर 'डेमियन-डटन' तसेच मॅगसेसे पुरस्काराने ते सन्मानित झाले आहेत. त्यांच्या अंगी असलेल्या अनेक गुणांतील कुठलाही एखादा गुण प्रत्येकाने अंगी बाणविण्याचे ठरविले तर समाजमनाचा चेहरामोहराच बदलून जाईल.

'डेमियन-डटन' पुरस्काराचा हा ओझरता इतिहास सांगताना बाबांच्या कार्यकर्तृत्वाचे आणि त्यांच्या आनंदवन या आधुनिक तीर्थक्षेत्राचे ओझरते दर्शन होऊन जाते.



# मॅगसेसे पुरस्कार

प्रत्येक पुरस्कारामागे काहीतरी इतिहास दडलेला असतो. थोर मान्यवर व्यक्तीच्या स्मृती त्यामागे असतात. त्यांचे कार्य आणि कर्तृत्व त्यामागे दडलेले असते. त्यांच्या हातून अपूर्णावस्थेत राहिलेले कार्य पुढे चालू राहावे अशी प्रेरणा असते. म्हणजेच त्या व्यक्तींचे कार्य, कर्तृत्व, इच्छा, आकांक्षा, मानवी मूल्ये उंचावण्यासाठी केलेली धडपड, समाज आणि राष्ट्र यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी त्यांनी केलेले प्रयत्न या साऱ्यांचा परिपाक पारितोषिकांच्या योजनेद्वारा मूर्तस्वरूप घेत असतो.

पुरस्कार देऊन ज्यांचा गौरव करायचा त्या व्यक्तींचे त्या त्या क्षेत्रातील कार्य, कर्तृत्व, सामर्थ्य आणि निःस्वार्थी सेवा तेवढीच मोलाची असावी लागते. पुरस्कार हा केवळ सन्मान नसतो, तर त्यातून इतरांना प्रेरणा लाभत असते. कार्य करणाऱ्यांना दिशा दाखविण्याचे सामर्थ्य पुरस्कारात दडलेले असते.

मॅगसेसे पुरस्काराची माहिती करून घेताना वरील सर्व मुद्यां-

कडे आपल्याला लक्ष द्यावे लागणार आहे. यातील पहिला मुद्दा मॅगसेसे यांच्या कार्यकर्तृत्वाचा आहे. 'मॅगसेसे पुरस्कार' हा त्यांच्या स्मृतीनिमित्त दिला जातो. त्यांचे चरित्र आणि चारित्र्य, तसेच वरील सर्व मूल्यांची जपणूक व्हावी, हा पुरस्कार देण्यामागे हेतू आहे.

मॅगसेसे हे फिलिपाइनचे तिसरे अध्यक्ष होते. 'भूमिहीन मध्यम वर्गातील असूनही शांतता, न्याय आणि सुव्यवस्था ,याद्वारे कारभार करणारा पहिलाच अध्यक्ष' असे फिलिपाइनचे लोक त्यांच्याविषयी उद्गार काढतात.

रेमन मॅगसेसे यांचा जन्म ३१ ऑगस्ट १९०७ रोजी एका लोहार कुटुंबात झाला.

विविध सरकारी कमिटयांवर त्यांनी कामे केली. १९५० ते ५३ या काळात राष्ट्रीय सुरक्षा सेक्रेटरी म्हणून काम केले. कित्येक कामचुकार अधिकाऱ्यांची त्यांनी हकालपट्टी केली. लष्करी शिस्त आणि सामान्य लोकांच्या सुखसोयी याकडे जातीने लक्ष पुरविले. साधी राहणी, देश, स्वातंत्र्य, सामान्य जनता यांचेविषयी सदैव आदर, चैतन्य आणि धैर्य, तसेच देशासाठी वाटेल तो त्याग करण्याची तयारी यामुळे मॅगसेसे सामान्य जनतेत अतिशय प्रिय होते. विशेषत: स्वार्थरहित सेवेमुळे त्यांना लोकप्रियता लाभली. 'प्रत्येक मानवप्राणी स्वातंत्र्य घेऊन जन्माला येतो,' असे ते म्हणत. असा हा चारित्र्यसंपन्न, स्वातंत्र्यप्रिय व धडाडीचा फिलिपिननेता १७ मार्च १९५७ रोजी विमान-अपघातात मृत्यू पावला.

रेमन मॅगसेसे यांच्या तत्त्वांची बूज राखली जावी, त्यांची चिरंतन स्मृती राहावी यासाठी त्यांच्या नावे पाच विभागात हा पुरस्कार देण्यात येत आहे. त्यांच्या प्रथमस्मृतिवर्षापासून म्हणजे

१९५८ पासून पुरस्कार द्यायला सुरुवात झाली. दरवर्षी त्यांच्या जन्मदिनी म्हणजे ३१ ऑगस्ट रोजी मनिला येथे पुरस्कार देण्याचा समारंभ साजरा होतो.

सरकारी सेवा, सामाजिक क्षेत्रातील सेवा, सामूहिक नेतृत्व, रेडिओ-दूरदर्शन-चित्रपट-वृत्तपत्र यांद्वारे जनजागृती करणारी व्यक्ती आणि आंतरराष्ट्रीय सामंजस्य व स्नेहसंवर्धन यासाठी झटणारी व्यक्ती, अशा पाच क्षेत्रात अविस्मरणीय, निःस्वार्थीपणे कार्य करणारी आशियाखंडातील स्त्री-पुरुष व्यक्ती वा संस्था मॅगसेसे प्रतिष्ठानमार्फत निवडली जाते.

प्रतिष्ठानचे कार्यकारी विश्वस्त विविध क्षेत्रातील व्यक्तींची निवड करतात. उत्कृष्ट कार्य केल्याच्या कागदपत्रांसह आपली नामनिर्देशनपत्रे त्यांना सादर करण्यास सांगतात. ३१ जानेवारी-पूर्वी नामनिर्देशनपत्रे प्रतिष्ठानकडे दाखल होतात. यातील प्रत्येक नामनिर्देशनपत्राची छाननी करण्यात येते. सप्टेंबर महिन्यात कार्यकारी विश्वस्त छाननी केलेली नामनिर्देशनपत्रे आपल्या शिफारशीसह कार्यकारी विश्वस्त मंडळापुढे ठेवतो. नामनिर्देशन-पत्राबरोबर कार्य केलेल्या कागदपत्रांचा अभ्यास केला जातो. पुरस्कारासाठी ५ वर्षांची सेवा व कार्य हेही लक्षात घेतले जाते. त्यानंतर पात्र व्यक्ती वा संस्था यांच्या निवडीवर शिक्कामोर्तब होते.

सरकारी वा खाजगी सेवा, सामूहिक नेतृत्व, साहित्य व पत्र-कारिता आणि आंतरराष्ट्रीय सामंजस्य हे पाच विभाग जीवना-तील सर्व क्षेत्रे व्यापून असल्याप्रमाणेच आहेत. रेमन मॅगसेसे यांच्या अंगचे गुण हे पुरस्कारासाठी निवडलेल्या व्यक्तीच्या अंगी असणे हीच कसोटी असते. स्वातंत्र्यप्रियता, प्रभावी व निःस्वार्थी

सेवा, समृद्ध अनुभव, धडाडी व चारित्र्यसंपन्न वागणूक इत्यादी गुणांचे तज्ज्ञांकडून मूल्यमापन झाल्यावर मगच विश्वस्त मंडळ एकमुखाने मॅगसेसे पुरस्कार जाहीर करते. एकदा निवड झाल्या-वर त्यात फेरबदल होत नाही.

या पुरस्कारासाठी मॅगसेसे प्रतिष्ठानला अमेरिकेतील रॉकफेलर ब्रदर्स फंडातून मोठी देणगी मिळाली. फिलिपिन काँग्रेसचे आर्थिक साहाय्य लाभले. सार्वजनिक क्षेत्रातून मोठ्या प्रमाणावर देणग्या मिळाल्या. शिवाय कर्जरूपानेही निधी उभा करण्यात आला. प्रतिष्ठानमार्फत पुरस्काराशिवाय अनेक कल्याणकारी योजना राबविल्या जातात. मॅगसेसे पुरस्कार त्यातूनच दिला जातो.

सुरवातीला दहा हजार डॉलर्सचा हा पुरस्कार होता. १९७७ पासून ही रक्कम दुप्पट करण्यात आली आहे. प्रत्येकी वीस हजार डॉलर, मॅगसेसे यांची मुद्रा असलेले पदक व गौरवपत्र असे पारि-तोषिकाचे स्वरूप असते.

भारतात आजपर्यंत अनेकजणांनी हा पुरस्कार मिळविला आहे. विनोबा भावे, चिंतामणराव देशमुख, मदर तेरेसा, जयप्रकाश नारायण, सत्यजित रे, सुब्बलक्ष्मी, शंभू मित्र, गौरकिशोर घोष, अरुण शौरी ही त्यातील काही नावे.

भारतात जी निर्दय जंगलतोड चालू आहे त्याचा एकंदर वातावरण व निसर्ग यावर भयावह परिणाम होणार आहे. ही जंगलतोड थांबावी यासाठी सामूहिक आंदोलनाद्वारे प्रयत्न कर-णारे ‘ चिपको आंदोलनाचे ’ झुंझार नेते चंडीप्रसाद भट्ट यांना त्यांच्या अविस्मरणीय कार्याबद्दल सामूहिक नेतृत्वासाठी असणारा पुरस्कार देण्यात आला.

१९८५ चे मॅगसेसे वाटेकरी प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते


श्री. बाबा आमटे हे आहेत. आनंदवनपासून त्यांचे कार्य सुरू झाले. आज प्रकृती साथ देत नसूनही ते ‘ भारत–जोडो ’ अभियान-पर्यंत आले आहे. बाल, युवक, वृद्ध अशा सर्व स्तरावरील समाजाला त्यांनी द्रष्टेपणाने मार्ग दर्शविला आहे. कुष्ठरोग्यांच्या सेवेबद्दल नुकताच त्यांना ‘ डेमियन-डटन ’ हा जागतिक पुरस्कार लाभला आहे. जमनालाल बजाज, फाय फौंडेशन पुरस्कार अशा अनेक पुरस्कारांनी त्यांच्या कार्याची दखल यापूर्वीच घेतली आहे.

मॅगसेसे पुरस्काराची शोधकथा आणि पुरस्कार मिळविणाऱ्यांची नि:स्वार्थी व धडाडीची समाजसेवा पाहिल्यावर तुम्हालाही असेच समाजसेवक व्हावे असे वाटत असेल. होय ना ?

*　　　　　*

## १९८७ चे मॅगसेसे पुरस्कार

१) पत्रकारिता– श्रीमती डायना यंगपेंग चिंग (तैवान)
२) वैद्यकीय सेवा– डॉ. आरी वाल्यासेवी (थायलंड)
३) शासकीय सेवा– डाटो हाजी हानाफियान बिन हाजी अहमद (मलेशिया)
४) साहित्यसमीक्षा– हान्स चागू जासीन (इंडोनेशिया)
५) मानवतावादी सेवा– फादर विलियम टिम व अन्य चारजण (बांगला देश).




सर रिचर्ड ॲटनबरो यांना १९८३ सालचे ' किंग पारितोषिक ' विभागून मिळाल्याचे जाहीर झाले. ॲटनबरो यांनी ' गांधी ' हा महात्मा गांधींच्या जीवन-कार्यावर आधारित चित्रपट काढला आहे. महात्माजींची सत्य, अहिंसा व मानवतावादी विचारसरणी जगातील कानाकोपऱ्यात पोहोचविण्याचे काम ॲटनबरोंनी चित्रपटाद्वारे केले. त्यांचा व पर्यायाने त्यांच्या कलेचा ' किंग पुरस्कार ' देण्यात येऊन सन्मान केला गेला.

ॲटनबरो यांचेबरोबर विभागून हे पारितोषिक मिळाले ते मार्टिन ल्यूथर किंग (सिनियर) यांना. ज्यांच्या नावे हे पारितोषिक दिले जाते त्या किंग (ज्युनियर) यांचे हे वडील. त्यांच्या सामाजिक कार्याचा गौरव या पुरस्काराने केला गेला.

सत्य, अहिंसा, मानवतावाद, शांतता व वर्णभेदनिर्मूलन यासाठी उत्कटपणे कार्य करणाऱ्या व्यक्तीचा 'किंग पुरस्कार' देऊन गौरव केला जातो. मार्टिन ल्यूथर किंग (ज्यु.) यांचे व त्यांच्या

कार्याचे स्मरण म्हणून दरवर्षी त्यांच्या जन्मदिनी म्हणजे १५ जानेवारी रोजी अॅटलांटा येथे पुरस्कार देण्याचा समारंभ साजरा होत असतो.

किंग (ज्यु.) यांचा जन्म १५ जानेवारी १९२९ रोजी दक्षिण अमेरिकेतील अॅटलांटा गावी झाला. त्यांचे खरे नाव माईकेल असे होते. हे निग्रो कुटुंब. वडील एका चर्चमध्ये धर्मगुरू होते. गोऱ्या लोकांकडून निग्रो लोकांचा पावलोपावली छळ होत असे. त्यांच्या-साठी शाळा वेगळ्या होत्या. पावलोपावली त्यांचा अपमान केला जाई. विनाकारण मारहाणही होत असे. बसमध्ये निग्रोंनी बसा-यच्या जागा वेगळ्या असत. क्षुल्लक कारणावरून त्यांना दंड होई. वयाच्या सहाव्या वर्षापासून छोट्या माईकेलला अशा त्रासाला तोंड द्यावे लागले. त्यामुळे तो खूप बेचैन आणि कष्टी झाला.

छोट्या माईकेलची ही बेचैन अवस्था पाहून त्याच्या वडिलांनी त्याला प्रोटेस्टंट पंथाचे संस्थापक मार्टिन ल्यूथर यांची जीवनगाथा ऐकविली. एवढेच नव्हे तर, त्यांचे सदैव स्मरण राहावे म्हणून ह्या बापलेकांनी आपली नावे 'मार्टिन ल्यूथर किंग' अशी ठेवून घेतली. वडील मार्टिन ल्यूथर किंग (सीनियर) व माईकेल किंग (ज्युनियर) म्हणून ओळखले जाऊ लागले. 'मार्टिन ल्यूथर'च्या नावाची प्रेरणा माईकेलला जीवनभर लाभली. त्यातूनच अमेरिके-तील काळ्या लोकांच्या उद्धाराचे कार्य ते अखेरपर्यंत करीत राहिले.

कुशाग्र बुद्धीचा माईकेल भराभर शिक्षण घेऊ लागला. कॉलेज-मध्ये असतानाच हेन्री डेव्हिड थोरोसारख्या विचारवंताचे ग्रंथ त्याने वाचले. हिंसेचे उत्तर हिंसेने द्यावयाचे, हे तत्त्व त्याच्या मनात घर करून राहिले.

बोस्टन महाविद्यालयातून तत्त्वज्ञान हा विषय घेऊन मार्टिन यांनी पीएच. डी. ही पदवी घेतली.

शिक्षणानंतर वडिलांप्रमाणेच माँटगोमेरी शहरात चर्चचे धर्मगुरू म्हणून काम पाहण्यास त्यांनी प्रारंभ केला.

मार्टिनना इथे येऊन वर्ष झाले असेल नसेल; शहरातील बसमध्ये एक संतापजनक प्रसंग घडला. एक निग्रो स्त्री बसमध्ये उभी होती. पुढच्या जागा गोऱ्या लोकांसाठी असतात हा नियम त्या स्त्रीला माहीत होता. तरीपण पाय दुखू लागले म्हणून त्यापैकी एका जागेवर ती बसली. गोऱ्या लोकांनी तक्रार केली. त्या स्त्रीला दंड झाला. काळे लोक ह्या घटनेवर संतापून उठले. त्यांनी सत्याग्रह, निदर्शने सुरू केली. मार्टिनने या आंदोलनात पुढाकार घेतला. काळ्या लोकांनी बसमध्ये पाय ठेवायचा नाही, असा त्याने आदेश दिला. वर्षभर हे आंदोलन चालू होते. काळ्या लोकांच्या ह्या असहकार आंदोलनाने बससेवा तोट्यात येऊ लागली. अधिकाऱ्यांना शरणागती पत्करावी लागली. उच्च न्यायालयानेही 'काळे-गोरे' असा भेदभाव न करता बससेवा चालू ठेवावी, असा निर्णय दिला. काळ्या लोकांनी मानवी हक्कासाठी आंदोलन करून मिळविलेला हा अपूर्व विजय होता. मार्टिनचे जीवन या विजयाने पार बदलून गेले. अहिंसावादी, मानवतावादी नेता म्हणून त्यांची प्रसिद्धी झाली.

१९५५ सालच्या वरील घटनेनंतर मार्टिन यांनी अमेरिकेत ठिकठिकाणी शांततामय आंदोलने उभारली. निग्रोंच्या उन्नतीसाठी व त्यांना मानवी हक्क मिळवून देण्यासाठी पदयात्राही काढण्यात आल्या.

धरणे, सत्याग्रह, निदर्शने यातून बऱ्याच वेळा त्यांना तुरुंगात

जावे लागले. १९५६ मध्ये त्यांच्या घरावर बॉंब फेकण्यात आला. त्यातून ते बचावले. पण लगेच त्यांना सुऱ्याने भोसकण्याचा अयशस्वी प्रयत्नही झाला.

शांततावादातच खरा मानवतावाद आहे, हे त्यांनी आपल्याच वर्तनाने सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. शत्रू-मित्र कोणीही असो, अहिंसा तत्त्वानुसार मानवाने कुणाला दुःखी करू नये, असे ते म्हणत. आपल्याला कुणी मारले तर आपण त्याला उलट मारू नये. ' बदला घेणे ' हा विचारच मनातून काढून टाकला तर, शत्रूबद्दल असणारी घृणा नष्ट होईल. त्यानंतर शत्रूवर प्रेम करण्याची आपल्या मनाची तयारी होईल.

मार्टिन यांचे हे विधान ऐकून गोरे लोकही त्यांच्याबद्दल आदर दर्शवू लागले. ' अमेरिकेचे गांधी ' म्हणून ते ओळखले जाऊ लागले. जगातील श्रेष्ठ विचारवंत पुढाऱ्यांत त्यांची गणना होऊ लागली.

१९६३ साली ' टाइम ' ह्या प्रसिद्ध वृत्तपत्राने ' महामानव ' हा पुरस्कार त्यांना बहाल केला. त्यापाठोपाठ १९६४ मध्ये शांततेमधील ' नोबेल पुरस्कार ' त्यांना देण्यात आला. आंतरराष्ट्रीय सामंजस्य, सदिच्छा व स्नेह यासाठी भारताने सुरू केलेला १९६६ चा ' नेहरू–पुरस्कार ' त्यांना देण्यात आला.

मेम्फीस येथे सफाई कामगारांनी शांततामय आंदोल चालविले होते, त्याचे नेतृत्व मार्टिन यांच्याकडे होते. ४ एप्रिल १९६८ या दिवशी या आंदोलनातच गोऱ्या इसमाने त्यांच्यावर गोळ्या झाडल्या. शांतता आणि मानवता यासाठी झगडणारा हा महात्मा हुतात्मा झाला.

आपल्या धावपळीच्या जीवनातून त्यांनी ग्रंथसंपदा निर्माण

बोस्टन महाविद्यालयातून तत्त्वज्ञान हा विषय घेऊन मार्टिन यांनी पीएच. डी. ही पदवी घेतली.

शिक्षणानंतर वडिलांप्रमाणेच माँटगोमेरी शहरात चर्चचे धर्म-गुरू म्हणून काम पाहण्यास त्यांनी प्रारंभ केला.

मार्टिनना इथे येऊन वर्ष झाले असेल नसेल; शहरातील बस-मध्ये एक संतापजनक प्रसंग घडला. एक निग्रो स्त्री बसमध्ये उभी होती. पुढच्या जागा गोऱ्या लोकांसाठी असतात हा नियम त्या स्त्रीला माहीत होता. तरीपण पाय दुखू लागले म्हणून त्यापैकी एका जागेवर ती बसली. गोऱ्या लोकांनी तक्रार केली. त्या स्त्रीला दंड झाला. काळे लोक ह्या घटनेवर संतापून उठले. त्यांनी सत्याग्रह, निदर्शने सुरू केली. मार्टिनने या आंदोलनात पुढाकार घेतला. काळ्या लोकांनी बसमध्ये पाय ठेवायचा नाही, असा त्याने आदेश दिला. वर्षभर हे आंदोलन चालू होते. काळ्या लोकांच्या ह्या असहकार आंदोलनाने बससेवा तोटयात येऊ लागली. अधि-काऱ्यांना शरणागती पत्करावी लागली. उच्च न्यायालयानेही 'काळे-गोरे' असा भेदभाव न करता बससेवा चालू ठेवावी, असा निर्णय दिला. काळ्या लोकांनी मानवी हक्कासाठी आंदोलन करून मिळविलेला हा अपूर्व विजय होता. मार्टिनचे जीवन या विजयाने पार बदलून गेले. अहिंसावादी, मानवतावादी नेता म्हणून त्यांची प्रसिद्धी झाली.

१९५५ सालच्या वरील घटनेनंतर मार्टिन यांनी अमेरिकेत ठिकठिकाणी शांततामय आंदोलने उभारली. निग्रोंच्या उन्नतीसाठी व त्यांना मानवी हक्क मिळवून देण्यासाठी पदयात्राही काढण्यात आल्या.

धरणे, सत्याग्रह, निदर्शने यातून बऱ्याच वेळा त्यांना तुरुंगात

जावे लागले. १९५६ मध्ये त्यांच्या घरावर बॉंब फेकण्यात आला. त्यातून ते बचावले. पण लगेच त्यांना सुऱ्याने भोसकण्याचा अयशस्वी प्रयत्नही झाला.

शांततावादातच खरा मानवतावाद आहे, हे त्यांनी आपल्याच वर्तनाने सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. शत्रू-मित्र कोणीही असो, अहिंसा तत्त्वानुसार मानवाने कुणाला दुःखी करू नये, असे ते म्हणत. आपल्याला कुणी मारले तर आपण त्याला उलट मारू नये. 'बदला घेणे' हा विचारच मनातून काढून टाकला तर, शत्रूबद्दल असणारी घृणा नष्ट होईल. त्यानंतर शत्रूवर प्रेम करण्याची आपल्या मनाची तयारी होईल.

मार्टिन यांचे हे विधान ऐकून गोरे लोकही त्यांच्याबद्दल आदर दर्शवू लागले. 'अमेरिकेचे गांधी' म्हणून ते ओळखले जाऊ लागले. जगातील श्रेष्ठ विचारवंत पुढाऱ्यांत त्यांची गणना होऊ लागली.

१९६३ साली 'टाइम' ह्या प्रसिद्ध वृत्तपत्राने 'महामानव' हा पुरस्कार त्यांना बहाल केला. त्यापाठोपाठ १९६४ मध्ये शांततेमधील 'नोबेल पुरस्कार' त्यांना देण्यात आला. आंतरराष्ट्रीय सामंजस्य, सदिच्छा व स्नेह यासाठी भारताने सुरू केलेला १९६६ चा 'नेहरू–पुरस्कार' त्यांना देण्यात आला.

मेम्फीस येथे सफाई कामगारांनी शांततामय आंदोल चालविले होते, त्याचे नेतृत्व मार्टिन यांच्याकडे होते. ४ एप्रिल १९६८ या दिवशी या आंदोलनातच गोऱ्या इसमाने त्यांच्यावर गोळ्या झाडल्या. शांतता आणि मानवता यासाठी झगडणारा हा महात्मा हुतात्मा झाला.

आपल्या धावपळीच्या जीवनातून त्यांनी ग्रंथसंपदा निर्माण

केली. स्ट्राईट टुवर्ड फ्रीडम (१९५८), स्ट्रेंग्थ टू लव्ह (१९६३), व्हाय वुई कांट वेट (१९६४), आय हॅव ए ड्रीम (१९६८) ही त्यांची पुस्तके गाजली.

मार्टिन यांचे मानवतावादी कार्य त्यांच्या पत्नी कोरेट्टा किंग व वडील किंग (सीनियर) यांनी आजही पुढे चालविले आहे. अॅटलांटा येथे त्यासाठी 'किंग फौंडेशन' स्थापन केले. त्यांचे जन्मस्थळ आणि भोवतीचा परिसर घेऊन, बहुउद्देशीय केंद्र स्थापन करण्यात आले. या केंद्राद्वारे किंग यांची स्मृती जागविण्यासाठी विविध उपक्रम केले जातात. किंग यांचे ग्रंथ, त्यांच्याविषयी इतरांनी लिहिलेले ग्रंथ, जीवन व कार्य दर्शविणारी छायाचित्रे, भाषणांच्या ध्वनिफिती यांचा प्रसार व प्रचार आणि विक्री केंद्र आहे. ज्ञानजागृती केंद्राद्वारे लहान-मोठ्यांसाठी विचारवर्ग चालविण्यात येतात. या विविध उपक्रमांतील एक उपक्रम म्हणजेच 'किंग पुरस्कार' आहे. जन्मदिनाचे औचित्य साधून पुरस्कार देण्याचा सोहळा याच केंद्रात साजरा होत असतो.

पुरस्कार–विजेत्यास रोख एक हजार डॉलर व प्रमाणपत्र बहाल करण्यात येते. मानवतावाद, सामंजस्य व जागतिक शांतता यासाठी झटणाऱ्या व्यक्तीची निवड यासाठी करण्यात येते. कोरेट्टा किंग या स्वतः पुरस्कार समितीच्या अध्यक्षा असून पुरस्कारासाठी योग्य व्यक्तीची निवड त्यांच्याकडून घोषित होते.

किंग यांच्या मृत्यूनंतर सन १९६९ पासून दरवर्षी हा पुरस्कार दिला जातो.

पुरस्काराच्या रकमेचे मोल कितीही लहान असले तरी, ज्या कारणासाठी पुरस्कार बहाल करण्यात येतो त्यामागील हेतू आणि प्रेरणा ह्या महत्त्वाच्या आहेत. 'अमेरिकेचे गांधी' म्हणून मानवता

आणि शांतता यासाठी झटलेल्या मार्टिन ल्यूथर किंग यांची खरी-खुरी प्रेरणा या पुरस्काराने निश्चितच साध्य झाली आहे यात शंका नाही.

*　　　　　　　　　　*

१९८५चा 'किंग पुरस्कार' नोबेल पुरस्कार विजेते द् आफ्रिकन बिशप डेस्मॉड टूटू यांना बहाल करण्यात आला आहे, तर १९८७ चा 'किंग पुरस्कार' फिलिपिनच्या पंतप्रधान श्रीमती ॲक्विनो यांना देण्यात आला आहे.

केली. स्ट्राईट टुवर्ड फ्रीडम (१९५८), स्ट्रेंग्थ टू लव्ह (१९६३), व्हाय वुई कांट वेट (१९६४), आय हॅव ए ड्रीम (१९६८) ही त्यांची पुस्तके गाजली.

मार्टिन यांचे मानवतावादी कार्य त्यांच्या पत्नी कोरेट्टा किंग व वडील किंग (सीनियर) यांनी आजही पुढे चालविले आहे. अॅटलांटा येथे त्यासाठी ' किंग फौंडेशन ' स्थापन केले. त्यांचे जन्मस्थळ आणि भोवतीचा परिसर घेऊन, बहुउद्देशीय केंद्र स्थापन करण्यात आले. या केंद्राद्वारे किंग यांची स्मृती जागविण्यासाठी विविध उपक्रम केले जातात. किंग यांचे ग्रंथ, त्यांच्याविषयी इतरांनी लिहिलेले ग्रंथ, जीवन व कार्य दर्शविणारी छायाचित्रे, भाषणांच्या ध्वनिफिती यांचा प्रसार व प्रचार आणि विक्री केंद्र आहे. ज्ञानजागृती केंद्राद्वारे लहान-मोठ्यांसाठी विचारवर्ग चालविण्यात येतात. या विविध उपक्रमांतील एक उपक्रम म्हणजेच ' किंग पुरस्कार ' आहे. जन्मदिनाचे औचित्य साधून पुरस्कार देण्याचा सोहळा याच केंद्रात साजरा होत असतो.

पुरस्कार–विजेत्यास रोख एक हजार डॉलर व प्रमाणपत्र बहाल करण्यात येते. मानवतावाद, सामंजस्य व जागतिक शांतता यासाठी झटणाऱ्या व्यक्तीची निवड यासाठी करण्यात येते. कोरेट्टा किंग या स्वत: पुरस्कार समितीच्या अध्यक्षा असून पुरस्कारासाठी योग्य व्यक्तीची निवड त्यांच्याकडून घोषित होते.


किंग यांच्या मृत्यूनंतर सन १९६९ पासून दरवर्षी हा पुरस्कार दिला जातो.

पुरस्काराच्या रकमेचे मोल कितीही लहान असले तरी, ज्या कारणासाठी पुरस्कार बहाल करण्यात येतो त्यामागील हेतू आणि प्रेरणा ह्या महत्त्वाच्या आहेत. ' अमेरिकेचे गांधी ' म्हणून मानवता

आणि शांतता यासाठी झटलेल्या मार्टिन ल्यूथर किंग यांची खरी-खुरी प्रेरणा या पुरस्काराने निश्चितच साध्य झाली आहे यात शंका नाही.

*    *

१९८५चा ‘ किंग पुरस्कार ’ नोबेल पुरस्कार विजेते द् आफ्रिकन बिशप डेस्मॉड टूटू यांना बहाल करण्यात आला आहे, तर १९८७ चा ‘ किंग पुरस्कार ’ फिलिपिनच्या पंतप्रधान श्रीमती ॲक्विनो यांना देण्यात आला आहे.




भाषा आणि संस्कृती यातील विविधता भारताइतकी अन्य कोणत्याही देशात नसेल. ह्या विविधतेतून एकता टिकविणे आणि जोपासणे हे कार्य अनेक पातळींवरून सतत चाललेले असते. प्रसिद्ध उद्योगपती शांतिप्रसाद जैन आणि श्रीमती रमादेवी जैन या पति-पत्नींनी ज्ञानपीठाची स्थापना करून असेच बहुमोल कार्य केले.

ज्ञानपीठ पुरस्कार मिळणे म्हणजे भारतीय साहित्यातील 'नोबेल पुरस्कार' प्राप्त होणे असे समजले जाते. ह्या पुरस्काराला आज एवढी प्रतिष्ठा आणि दर्जा प्राप्त झाला आहे.

अशा ह्या भारतीय ज्ञानपीठाने १९४४ साली आपल्या कार्याला

सुरुवात केली. संस्कृत, प्राकृत, कानडी, तमिळ अशा भाषांतील दुर्मिळ हस्तलिखिते व ग्रंथ यांचे संशोधन, भाषांतर व पुनर्मुद्रणाचे कठीण व मोठ्या खर्चाचे व धाडसाचे काम प्रथम हाती घेण्यात आले. हे दुर्लक्षित ज्ञानभांडार प्रकाशात आणण्यासाठी मूर्तिदेवी ग्रंथमाला, कन्नड ग्रंथमाला, लोकोदय ग्रंथमाला, राष्ट्रभारती ग्रंथमाला सुरू केल्या. श्रीमती रमादेवी जैन सुरवातीपासून ज्ञानपीठाच्या अध्यक्षा होत्या. भारतातील विद्वान साहित्यिक, संशोधक, विद्यापीठातील भाषाप्रमुख यांच्यामार्फत ग्रंथप्रकाशनाचे कार्य त्यांनी चालविले होते. यातूनच त्यांनी ज्ञानपीठ पुरस्काराची योजना आखली. अनेक चर्चासत्रे व जाणकारांशी विचार--विनिमय करून त्याचे स्वरूप ठरविले गेले, आणि १९६५ ला पहिला 'ज्ञानपीठ पुरस्कार' दिला गेला. योजनेला मूर्तस्वरूप लाभले. त्यानंतरदरवर्षी अखंडपणे भारतीय साहित्यासाठी 'ज्ञानपीठ पुरस्कार' देऊन एका साहित्यिकाचा बहुमान केला जातो.

ज्ञानपीठ पुरस्कारासाठी १५ राजमान्य भारतीय भाषांतील साहित्याचा विचार करण्यात येतो. भारतीय विद्यापीठे, त्यांचे भाषाप्रमुख, अन्य शिक्षणसंस्थांचे प्रमुख, विख्यात साहित्यिक, समीक्षक, भाषाशास्त्रज्ञ अशा सर्वांना आपापल्या मातृभाषेतील साहित्यकृतीची शिफारस करण्याची विनंती करण्यात येते. प्रत्येक भाषेसाठी तीन जणांची सल्लागार समिती असते. ही समिती वर उल्लेखिलेल्या शिफारशीनुसार ग्रंथाची काळजीपूर्वक छाननी करते आणि आपल्या भाषेतील एका साहित्यिकाची निवड करून त्याला पुरस्कार देण्याची विनंती निवड समितीस करते. दहा ते बारा जणांच्या निवड समितीत अखेरची व एकाच साहित्यिकाच्या ग्रंथाची निवड करावयाची असते. त्यामुळे काटेकोरपणे साहित्य-

कृती व साहित्यिक या दोहोंचा बारकाईने अभ्यास करण्यात येतो. अखेरच्या टप्प्यात आलेल्या ३।४ ग्रंथांचे हिंदीत भाषांतर केले जाते. त्यामुळे तौलनिक अभ्यास करून निर्णय घेणे बरेचसे सुलभ होते. अशा तऱ्हेने विविध चाळणीतून उरलेली साहित्यकृती ज्ञानपीठासाठी योग्य ठरविण्यात येते. ही निवड करताना त्या साहित्यिकाच्या एकाच ग्रंथाचा विचार केला जात नाही. त्याची एकंदर साहित्यनिर्मिती, त्याचा सामाजिक राष्ट्रीय दर्जा, विद्वत्ता आणि व्यक्तिमत्त्व इत्यादी सर्व बाबींचाही विचार करण्यात येतो. 'ज्ञानपीठ पुरस्कार' हा असा कस लावून पारखून व साहित्य आणि साहित्यिक यांचे मूल्यमापन करून देण्यात येत असल्याने त्याचे महत्त्व व दर्जा नोबेलप्रमाणे अत्यंत वरचा आहे.

काही वेळा एकाऐवजी दोन साहित्यिकांची अखेरच्या टप्प्यात निवड होते. त्यावेळी दोघांना ज्ञानपीठाची रक्कम विभागून देण्यात येते. त्याचप्रमाणे एखाद्या वर्षी एकही वाङ्मयीन कृती पुरस्कारायोग्य वाटली नाही तर त्या वर्षी पुरस्कार देण्यात येत नाही.

पुरस्कार सुरू झाल्यापासून काश्मिरी, संस्कृत व सिंधी ह्या भाषांतील साहित्यास अद्यापी पुरस्कार लाभलेला नाही. मराठीसह आठ भाषांना एकदाच पुरस्कार मिळाला. मल्याळीने १९८४ चा पुरस्कार धरून ज्ञानपीठ पुरस्कार तीनदा पटकावला. बंगालीला तीनदा हा बहुमान मिळाला. हिंदी साहित्यिकांनी चार वेळा ज्ञानपीठ पुरस्कार घेऊन राजभाषेचा डौल सार्थ असल्याचे सिद्ध करून दाखविले. १९८३ चा पुरस्कार धरून कानडीनेही चार वेळा पुरस्कार घेतला आहे.

१९६७ साली गुजराती व कानडी या भाषेतील साहित्यास आणि १९७३ साली उडिया व कानडी भाषेतील साहित्यास ज्ञान-

पीठ पुरस्कार विभागून देण्यात आला.

पुरस्कार मिळालेल्या भाषेचा पुढील तीन वर्षापर्यंत पुरस्कारासाठी विचार करण्यात येत नाही. तसेच ज्ञानपीठ पुरस्कार बहाल केलेल्या साहित्यिकाला पुन्हा हा पुरस्कार दिला जात नाही.

पुरस्कार मिळालेल्या साहित्यिकास त्याच्या साहित्यकृतीचा व एकंदर साहित्याचा गौरव करणारा ताम्रपट देण्यात येतो. त्याशिवाय, वाग्देवीची ब्राँझची मूर्ती आणि एक लाख रुपयांचा पुरस्कार देण्यात येतो. वाग्देवीची मूर्ती ही भोजराजाने उज्जयिनीच्या सरस्वती मंदिरात स्थापन केली होती. सध्या लंडनच्या ब्रिटिश म्युझियममध्ये असलेल्या ह्या मूर्तीच्या प्रतिकृतीत किंचित बदल करण्यात आला आहे. देवी कमळाच्या पाकळ्यांवर उभी आहे. ह्या १५ पाकळ्या म्हणजे पुरस्कारासाठी स्वीकारण्यात आलेल्या १५ भारतीय राजमान्य भाषांचे प्रतीक आहेत. मूर्तीच्या मागे प्रभामंडळ असून जैन तोरणाची प्रतिकृती दाखविण्यात आली आहे. हातात पुस्तक, कमळ हे सर्व साहित्य आणि शुचिर्भूतता तसेच पावित्र्याचे निदर्शक आहेत. साहित्यिकाला वाग्देवीची मूर्ती बहाल करून सर्व दृष्टींनी औचित्य साधण्यात येते.

सुरवातीपासून एक लाख रुपयांचा पुरस्कार देण्यात येत असे. १९८२ पासून ह्या रकमेत वाढ करण्यात आली असून ती दीड लाख करण्यात आली आहे.

१९६५ साली पहिला 'ज्ञानपीठ पुरस्कार' देण्यात आला. त्यावेळी १९२० ते १९५८ या कालावधीत प्रकाशित झालेल्या साहित्याचा विचार करण्यात आला होता. हा प्रथम पुरस्कार प्रसिद्ध मल्याळी महाकवी जी. शंकर कुरूप यांना 'ओटाकुझल' ( बासरी ) या महाकाव्याबद्दल देण्यात आला. १९७४ चा दहावा ज्ञानपीठ पुर-

स्कार मराठीने पटकावला. कै. वि. स. खांडेकर यांच्या ‘ ययाति ’ या कादंवरीवद्दल हा पुरस्कार देण्यात आला. ‘ ययाति ’ ही पौराणिक कादंबरी असली तरी विषयभोग हा सध्याच्या विज्ञानयुगात ययातीच्या रूपाने वाढतोच आहे. चिंतनसुख कशात आहे हे आजचा मानव विसरत चालला आहे. ‘ ययाति ’ च्या रूपाने शाश्वत मूल्यांची आठवण कै. भाऊसाहेव खांडेकर यांनी मानवाला पुन्हा एकवार करून दिली आहे. भाऊंच्या ह्या साहित्यकृतीची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली त्यावेळी भाषा सल्लागार समितीत मराठी भाषेसाठी डॉ. य. दि. फडके, डॉ. अशोक केळकर आणि प्रसिद्ध कवी मंगेश पाडगावकर हे होते. निवड समितीमध्ये प्रा. मं. वि. राजाध्यक्ष यांचाही समावेश होता.

१८ वा ज्ञानपीठ पुरस्कार १९८२ साली श्रीमती महादेवी वर्मा यांना त्यांच्या ‘ यामा ’ आणि ‘ दीपशिखा ’ या काव्यसंग्रहाबद्दल देण्यात आला. पुरस्कार मिळालेल्या ह्या तिसऱ्या स्त्री-साहित्यिका आहेत. आशापूर्णादेवी यांच्या ‘ प्रथम प्रतिश्रुती ’ या बंगाली कादंबरीस १९७६ चे आणि अमृता प्रीतम यांच्या ‘ कागज ते कॅनव्हास ’ या पंजाबी साहित्यकृतीस यापूर्वी ज्ञानपीठ मिळाले होते.

भाऊंना ज्ञानपीठाचा वहुमान देण्यात आला तो महादेवी वर्मा यांच्या हस्ते. साहित्यिकाने साहित्यिकाचा गौरव करायचा याला कै. भाऊंनी खरे महत्त्व दिले होते.

अगदी अलीकडचा म्हणजे १९८६ चा ज्ञानपीठ पुरस्कार सुप्रसिद्ध उडिया कवी व साहित्यिक डॉ. सच्चिदानंद राऊत राय यांना देण्यात आला आहे. ज्ञानपीठाचा संक्षिप्त इतिहास हा असा. त्याची स्थापना करणारे शांतिप्रसाद जैन आज ह्यात नाहीत,


आणि श्रीमती रमादेवी तर त्यांच्या आधी गेल्या. ज्ञानलालसेपायी या उद्योगपतीने निःस्पृहतेने सुरू केलेले हे कार्य निष्कलंकपणे नियमित चालू आहे. लक्ष्मी आणि सरस्वती क्वचितच एकेठायी येतात. जैन कुटुंब त्यादृष्टीने अत्यंत भाग्यशाली आहे. हे भाग्य आपल्या कुटुंबियांपुरते मर्यादित न ठेवता मुक्तहस्ताने अखिल भारतवर्षात विखुरले जावे, अशी प्रेरणा होणे हेही मानवी मनाच्या मोठेपणाचे लक्षण आहे. ज्ञानपीठाचे कार्य अखंड चालू राहील. एवढेच नव्हे, तर सृजनपर्वासारखे नवीन धुमारे त्याला फुटत राहतील यात शंका नाही.

*　　　　*

ज्ञानपीठ पुरस्कार मिळालेले अलीकडील पाच वर्षांतील थोर साहित्यिक—

१९८६ डॉ. सच्चिदानंद राऊत राय (उडिया)
१९८५ पन्नालाल पटेल (गुजराथी)
१९८४ थकाजी शिवशंकर पिल्ले (मल्याळी)
१९८३ मास्ती वेंकटेश अय्यंगार (कानडी)
१९८२ महादेवी वर्मा (हिंदी)
(१९८२ पासून दीड लाख रुपये पुरस्कार देण्यात येतो.)

1990 चा ज्ञानपीठ पुरस्कार हा उर्दू कवी समीक्षक श्रीमती हैदर यांना मिळाला आहे.




क्रीडाक्षेत्रातील सर्वोच्च मानाचा राष्ट्रीय पुरस्कार म्हणून 'अर्जुनवीर पुरस्कार' ओळखला जातो. अर्जुन हे महाभारतातील अत्यंत महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व होते. बुद्धिमान, विनयशील, चारित्र्य-संपन्न, आदर्श विद्यार्थी म्हणून त्याची विशेष प्रसिद्धी होती. सव्यसाची धनुर्धारी अर्जुनामुळे हिंदू समाजाला भगवद्गीता मिळाली, असे म्हटले जाते. पराक्रमाबरोबर युद्धात खिलाडूवृत्ती आणि नियम जोपासले गेले पाहिजेत हे कौरवांना त्यांच्या गैर-वर्तनाचे वेळी त्याने बजावले होते. युद्ध आणि खेळ दोन्ही ठिकाणी

ईर्षा आणि स्पर्धा असते आणि असावी लागते. ईर्षेतून बऱ्याच वेळी चीड निर्माण होण्याची शक्यता असते. त्यातूनच गैरप्रकारांना सुरुवात होते. अशा वेळी अर्जुनाच्या संपन्न व्यक्तिमत्त्वाची, संयम आणि सद्‌गुणांची आठवण ठेवून, त्यानुसार खेळाडूंनीही आपापल्या क्षेत्रात पराक्रमाबरोबर अन्य सद्‌गुणांची जोपासना करावी, या उदात्त हेतूने भारत सरकारने 'अर्जुनवीर पुरस्कार' १९६१ पासून सुरू केला.

क्रीडाक्षेत्रात असामान्य कामगिरी करणाऱ्या क्रीडापटूंना दरवर्षी हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते.

ऑल इंडिया कौन्सिल ऑफ स्पोर्टस् आणि शिक्षणमंत्रालय यांची मान्यता असलेल्या ३० क्रीडाप्रकारांतील खेळाडूंसाठी अर्जुनवीर पुरस्कार ठेवण्यात आला आहे. यात खोखो, कबड्डी, कुस्ती, पोहणे यांसारखे देशी खेळ आहेत. क्रिकेट, टेबलटेनिस, बॅडमिंटन, गोल्फ, हॉकी असे विदेशी खेळही आहेत. मात्र दरवर्षी सर्व क्रीडाप्रकारांतील खेळाडूंना अर्जुनवीर पुरस्कार मिळतोच असे नाही. एखादे वर्षी एखाद्या क्रीडाप्रकारात पुरस्कारायोग्य क्रीडापटू आढळला नाही तर, त्या वर्षी त्या क्रीडाक्षेत्रासाठी पुरस्कार देण्यात येत नाही. सुरवातीच्या दहा वर्षांत म्हणजे १९६१ ते १९७१ या काळात २२ खेळप्रकारांत १२० खेळाडूंनाच अर्जुनवीर पुरस्कार बहाल करण्यात आला आहे. यावरून निवडीच्या काटेकोरपणाची थोडीफार कल्पना येईल.

अर्जुनवीर पुरस्कार हा सर्वोच्च राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार असल्याने, पुरस्कारासाठी निवड व्हावयाचा क्रीडापटू हा तितकाच तोलामोलाचा असावा लागतो हे ओघानेच आले. पुरस्कारासाठी क्रीडापटूंकडून व्यक्तिशः अर्ज मागविले जात नाहीत. कुठल्याही

प्रकारे स्पर्धा घेतल्या जात नाहीत. भारत सरकारचे शिक्षण-मंत्रालय आणि ऑल इंडिया कौन्सिल ऑफ स्पोर्टस् (ए. आय. सी. एस.) यांनी मान्यता दिलेल्या राष्ट्रीय संघटनांकडून दरवर्षी अर्जुनवीर पुरस्कारासाठी नामनिर्देशनपत्रे मागविली जातात. राष्ट्रीय संघटनेकडे नोंदणी झालेल्या खेळाडूंपैकी पुरस्कारायोग्य खेळाडू असल्यास त्याची शिफारस ए. आय. सी. एस. कडे केली जाते. जिल्हा स्तरावर एखाद्या क्रीडाप्रकारात प्राविण्य मिळविणाऱ्या खेळाडूंची जिल्हा संघटनेकडे नोंद होते. राज्य पातळीवर प्राविण्य मिळविल्यास राज्य क्रीडा संघटनेकडे नोंद होते. त्याचप्रमाणे राष्ट्रीय पातळीवर प्राविण्य मिळविणाऱ्या खेळाडूंची नोंद राष्ट्रीय क्रीडा संघटनेकडे होत असते. म्हणजेच प्राविण्याच्या पायऱ्या ओलांडून सतत प्रगतिपथावर राहणे, त्यातूनच राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय प्राविण्य मिळविणे ही अर्जुनवीर पुरस्कारासाठी आवश्यक पात्रता आहे, असे म्हणावे लागेल. म्हणजेच राज्यपातळीवर पोहोचलेल्या एखाद्या क्रीडापटूची नोंद राष्ट्रीय क्रीडा संघटनेकडे नसल्याने साहजिकच अशा क्रीडापटूंची शिफारस अर्जुनवीर पुरस्कारासाठी होऊ शकत नाही. त्यासाठी त्याने राष्ट्रीय प्राविण्य मिळविण्याचा टप्पा ओलांडावाच लागतो. अशा रीतीने राष्ट्रीय संघटनांकडून आलेल्या नामनिर्देशनपत्रांची ए. आय. सी. एस. च्या स्थायी समितीत छाननी होते. त्यातून पात्र अशा खेळाडूंची शिफारस केली जाते. नेमलेल्या समितीच्या या शिफारशी योग्य आहेत किंवा नाहीत ह्याची फेरतपासणी ए. आय. सी. एस. करते व पुन्हा पुरस्कृत खेळाडूंची नावे भारत सरकारकडे पाठविते. ए. आय. सी. एस. ची शिफारस नसली तरी, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय प्राविण्य मिळवून सतत प्रकाशाच्या झोतात

असणाऱ्या एखाद्या पात्र क्रीडापटूची भारत सरकारकडून पुरस्कारासाठी निवड होऊ शकते. ए. आय. सी. एस. च्या शिफारशीनुसार पुरस्कारयोग्य क्रीडापटूंच्या अंतिम यादीवर शिक्कामोर्तब करण्यापूर्वी भारत सरकारही सर्व निकषांची छाननी करीत असते. क्रीडापुरस्कार द्यावयाच्या वर्षात सर्वोत्कृष्ट प्राविण्य असावे लागतेच, पण त्याआधीची दोन वर्षेही किंवा आंतरराष्ट्रीय पातळीवरील क्रीडानैपुण्य किंवा नवे विक्रम प्रस्थापित केलेले असावे लागतात. शिवाय नैपुण्याची चढती कमान असावी लागते. एकदा अर्जुनवीर पुरस्कार दिलेल्या क्रीडापटूस पुन्हा हा सन्मान दिला जात नाही.

पुरस्कार विजेत्यास खास समारंभात सन्मानपदक व शिफारसपत्र दिले जाते. शिफारसपत्रात हिंदी व इंग्रजी भाषेतून खेळप्रकार व खेळाडूचे नाव व वर्ष नमूद केलेले असते. वरील बाजूस भारत सरकारचे बोधचिन्ह व खालील बाजूला शिक्षणमंत्रालय सचिवाची सही असते. सन्मानपदक ब्राँझचे असून मत्स्यभेद करणाऱ्या अर्जुनाची प्रतिकृती पुरस्कार म्हणून दिली जाते. क्रीडापटूंनी आपल्या क्रीडाक्षेत्रात अर्जुनाप्रमाणे एकाग्रतेने साधना करावी असा संदेश आणि स्फूर्ती ह्या सन्मानपदकाद्वारे मिळावी, अशी संयोजकांची कल्पना तर नसेल !

१९६१ पासून आजपर्यंत विविध क्षेत्रातील अनेक नामवंत क्रीडापटूंनी अर्जुनवीर पुरस्कार पटकावला आहे. आंतरराष्ट्रीय क्रीडाक्षेत्रातही नावलौकिक मिळविलेले स्त्री-पुरुष खेळाडू यात आहेत. अगदी पहिल्याच वर्षी नंदू नाटेकर यांनी बॅडमिंटनमधील प्राविण्याबद्दल हा पुरस्कार घेतला. कोल्हापूरचे गणपत आंदळकर १९६३ चे कुस्ती प्राविण्याबद्दल अर्जुनवीर पुरस्काराचे मानकरी

मौर्यकाळात (इ. स. पू. २६३) अशोकाने कलिंगवर स्वारी केली ही तर इतिहासप्रसिद्ध घटना आहे. त्यावेळी कलिंगचे राज्य बलाढ्य होते. अशोकाला मोठी लढाई करावी लागली. त्याने कलिंगवर विजय मिळविला. पण युद्धात दोन्हीकडील सैन्याची अपरिमित हानी झाली हे पाहून त्याला फार दुःख झाले. उपरती होऊन त्याने बौद्धधर्माचा स्वीकार केला. शांतता, सलोखा, मानवी कल्याणकारी तत्त्वे, इत्यादी बौद्धधर्मातील शिकवणुकींचा स्वत: अवलंब केलाच; पण प्रजेपर्यंत संदेश पोचविण्याचे महान कार्य त्याने उर्वरित आयुष्यात केले.

त्यानंतर कलिंग पुन्हा स्वतंत्र झाला. चेदिवंशातील खारवेल राजाने आपल्या छोटयाशा कारकीर्दीत जैन धर्माचा प्रसार केला.

समुद्रगुप्त, हर्षवर्धन यांचेनंतर सोमवंशातील राजांनी कलिंग-वर राज्य केले. इ. स. ७२५ मध्ये केसरी वंशातील महाशिव-गुप्ताने कलिंगाचे साम्राज्यात रूपांतर केले. त्याचा ओढा हिंदुधर्मा-कडे होता. त्यानेच पुरी येथे जगन्नाथाचे मंदिर उभारले. यानंतर गंगवंशाकडे सत्ता आली. गंगांच्या कारकीर्दीत अनेक हिंदू देवा-लये उभारली गेली. १३ व्या शतकातील कोनार्कचे सूर्यमंदिर नर-सिंहदेवाने उभारले.

इ. स. १५६८ मध्ये कालापहाड याने मुकुंददेव या शेवटच्या हिंदूराजाची सत्ता धुडकावून लावली. त्यानंतर अकबराच्या वेळी राजपुतांच्या व पुढे काही दिवस मराठ्यांच्या अमलाखाली कलिंग देश होता. पुढे १८०३ मध्ये तो ब्रिटिशांच्या अधिपत्याखाली गेला.

अशोकाचे कोरीव लेख, खंडगिरी, उदयगिरी येथील राणी-

ठरले. विजय मांजरेकर, चंदू बोर्डे, अजित वाडेकर ह्या क्रिकेट-वीरांनी अनुक्रमे १९६५, ६६ व ६७ मध्ये अर्जुनवीर पुरस्कार घेतला. तसे पाहिले तर क्रिकेटमध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या मंडळींची 'अर्जुनवीर पुरस्कारा'तील संख्या भरीव आहे.

१९७१ मध्ये बॅडमिंटनमधील 'अर्जुनवीर पुरस्कार' शोभा मूर्ती यांनी कोल्हापूरला मिळवून दिला. १९७८ साली टेबल-टेनिस प्राविण्याबद्दल कोल्हापूरच्या कु. शैलजा साळोखे यांना 'अर्जुनवीर पुरस्कार' बहाल करण्यात आला. विद्यार्थीदशेपासून शैलजा साळोखे यांनी आंतरराष्ट्रीय तसेच राष्ट्रीय सामन्यांतून टेबल-टेनिसमधील आपले प्राविण्य दाखविले आहे.

तसे पाहिले तर अर्जुनवीर पुरस्कार मिळविणाऱ्या क्रीडापटूंवर खूपच लिहिता येण्यासारखे आहे. तो एक स्वतंत्र विषयच होऊ शकेल. पण एक खरे की, देशी असो, विदेशी असो; क्रीडा आणि क्रीडापटू यांचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे हे नाकारता येणार नाही. ऑलिंपिकमध्ये आपण अजून मागे आहोत याची खंत असली तरी शासनापासून खेळाडूपर्यंत सर्वजण आता याबाबतीत जागृत होत आहेत हेही काही कमी नाही. शिवछत्रपतीसारखे राज्य पुरस्कार किंवा अर्जुनवीरसारखे राष्ट्रीय पुरस्कार यातूनच आपल्या क्रीडापटूंना पुढे वाटचाल करण्याची स्फूर्ती मिळणार आहे यात शंका नाही.


*　　　　　　　　*

## १९८६ चे अर्जुनवीर पुरस्कार

१) सुमन रावत (अॅथ.), २) महंमद अझरुद्दीन (क्रिकेट), ३) जयपालसिंग (मुष्टियुद्ध), ४) संध्या अगरवाल (क्रिकेट), ५) जे. एम. कार्व्हालो (हॉकी), ६) कु. रमा सरकार (कबड्डी), ७) सिरील वल्लूर (व्हॉलीबॉल), ८) भगीरथ सहाय (नेम-बाजी), ९) ध्रुव भंडारी (यार्टिग), १०) प्रेमचंद (शरीर-सौष्ठव), ११) लेफ्ट. कर्नल के. एस्. राव व जगमोहन सप्रा (वेटलिफ्टिंग), १२) कु. आरती प्रधान (पोहणे).

अर्जुनवीर पुरस्काराबरोबरच क्रीडाक्षेत्रातील असामान्य कामगिरीबद्दल क्रीडा-प्रशिक्षकांना ‘ द्रोणाचार्य पुरस्कार ’ गेल्या वर्षीपासून सुरू केला असून १९८६ चा हा पुरस्कार १) देशप्रेम आझाद (क्रिकेट), २) रघुनंदन वसंत गोखले (बुद्धिबळ) या दोघांना देण्यात आला आहे. पुरस्कार २५००० रु. व मानचिन्ह असा आहे.

२२४८ २०.९.८
शा.वा.



# कालिदास पुरस्कार

कथ्थक नृत्यामध्ये अखिल भारतीय कीर्ती मिळविलेल्या पंडित बिरजू महाराजांना नृत्यातील, तसेच प्रसिद्ध रुद्रवीणावादक उस्ताद झिया मोहिउद्दीन डागर यांना संगीतातील १९८६-८७ चे 'कालिदास सन्मान' राष्ट्रीय पुरस्कार देण्यात आले आहेत. एक लाख रुपये व स्मृतिचिन्हे देऊन होणारा हा सन्मान म्हणजे नृत्य-नाटच-संगीत कलेचाच सन्मान आहे.

प्राचीन संस्कृत साहित्याचा मुकुटमणी कालिदास याच्या नावे पुरस्कार देण्यात मध्यप्रदेश सरकारने मोठे औचित्य साधले आहे. संगीत, नाटक, नृत्य, चित्र, शिल्प अशा प्राचीन ललित-कलांचे मर्म जाणणारा श्रेष्ठ व विद्वान महापंडित म्हणून कालि-दासाकडे बोट दाखविले जाते. 'कवि कुलगुरु' अशा शब्दात आपण त्याचा गौरव करतो. पाश्चिमात्य लोक त्याला 'भारताचा शेक्स-पीयर' असे म्हणतात.

इ. स. पूर्व पहिले किंवा दुसरे शतक हा त्याचा जन्मकाल. जन्मस्थळाबाबतही असाच वाद आहे. भोजराजाच्या पदरी असणाऱ्या श्रेष्ठ नवरत्नांत कालिदासाचा समावेश होता, असे दिसून येते. विविध कथा-दंतकथांनी त्याचे चरित्र भरले आहे हे मात्र खरे. कालिदासाच्या चरित्रातील वादग्रस्त भागाकडे दुर्लक्ष करून, त्याच्या विद्वत्तेवर लोकांनी निर्विवाद शिक्कामोर्तब केले आहे हे मात्र खरे !

रघुवंश व कुमारसंभव ही दोन महाकाव्ये, ऋतुसंहार व मेघदूत ही दोन खंडकाव्ये, मालविकाग्निमित्र, विक्रमोर्वशीय आणि शाकुंतलम् ही तीन नाटके, अशी त्याची ग्रंथसंपदा आज उपलब्ध आहे. हे सात ग्रंथ म्हणजे संस्कृत साहित्याची भूषणे आहेत. साहित्य, संगीत, नृत्य, नाट्य अशा सर्व ललितकलांचे मर्मस्पर्शी उल्लेख त्यात आहेत. भारतीय शास्त्रे व तत्त्वज्ञान, भाषा व अलंकार, रसपरिपोषण, नैसर्गिक आणि भौगोलिक संदर्भ या साऱ्यांबरोबर जीवनविषयक विद्वत्ता त्याच्या साहित्यातून दिसून येते. म्हणूनच कालिदासाच्या वाङ्मयीन कर्तृत्वाला तोड नाही.

मध्यप्रदेश सरकारने कालिदासाच्या सर्वांगीण विद्वत्तेची चिरस्मृती जागृत ठेवण्याच्या दृष्टीने दरवर्षी एक लाख रुपयांचा पुरस्कार जाहीर केला. संगीत, नृत्य, साहित्यविषयक क्षेत्रात विशेष कार्य करणाऱ्या श्रेष्ठ भारतीय व्यक्तींचा हा पुरस्कार देऊन सन्मान केला जातो. संगीतातील प्रतिभा व प्रतिमा, नवनिर्मितीची क्षमता, आजवर या क्षेत्रात केलेली मोलाची कामगिरी इत्यादी सर्व बाबींची कसून छाननी झाल्यावर मगच 'कालिदास सन्मान' पुरस्कारासाठी योग्य त्या व्यक्तीची निवड होत असते.

'कालिदास पुरस्कार' हा मध्यप्रदेश सरकारकडून दिला

जाणारा राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार आहे. एक लाख रुपये रोख आणि मानपत्र असे याचे स्वरूप आहे. पुरस्कार-वितरणासाठी खास समारंभ आयोजित केला जातो. पुरस्कारित व्यक्तीची निवड करण्यासाठी दरवर्षी मध्यप्रदेश सरकारकडून एक समिती नेमली जाते. संगीत, नाटक, समीक्षा, चित्रपट अशा विविध कला क्षेत्रातील तज्ज्ञांचा या समितीत समावेश असतो.

१९८५-८६ मध्ये कुमार गंधर्व यांची निवड सात सदस्यांच्या निवड समितीने एकमुखाने केली. त्यात प्रख्यात संगीतकार व तत्त्वज्ञ जयदेवसिंग, संगीतकार वामनराव देशपांडे. पु. ल. देशपांडे, संगीतसमीक्षक कृष्ण चैतन्य, प्रा मेहता, चित्रपटनिर्माते कुमार सहानी आणि मुकुंद अशा सात जणांचा समावेश होता.

पंडित कुमार गंधर्व नुसतेच गायक नाहीत, ते निर्मितिक्षम श्रेष्ठ संगीततज्ज्ञ आहेत. वयाच्या सातव्या वर्षापासून त्यांनी गायकीला वाहून घेतले. आजअखेर सतत प्रयोगशीलता आणि नवनवीन चीजा बांधून त्यांनी आपले श्रेष्ठत्व टिकवून ठेवले आहे. त्यांचा गायकीचा,संशोधनाचा आणि आजवरच्या कलासेवेचा गौरव ‘ पद्मभूषण ’ किताब देऊन भारत सरकारने यापूर्वीच केला आहे. संगीत नाटक अकादमीचा पुरस्कारही त्यांना यापूर्वी मिळाला आहे. ‘ कालिदास सन्मान ’ हा पुरस्कार त्यांच्या यशाचा शिरपेच आहे, असे म्हणायला हरकत नाही.

नवीन चीजा आणि ‘ गांधीराग ’ ही त्यांची संगीतक्षेत्रातील नवनिर्मिती आहे. त्याचबरोबर ‘ अनुपराग विलास ’ हा संगीतविषयक ग्रंथ हे चिरस्मरणीय मैफिलीप्रमाणे रसिकांच्या स्मृतीत राहणार आहेतच.

कालिदास हा प्राचीन भारतीय ललितकलांचा मुकुटमणी ! त्याच्या नावे त्याचे कार्य पुढे चालविणाऱ्या योग्य व्यक्तीचा, राष्ट्रीय पातळीवर मध्यप्रदेश सरकारकडून होणारा सन्मान खऱ्या अर्थाने लाख मोलाचा आहे, यात शंका नाही.

* *

१९८७ चा 'कालिदास सन्मान पुरस्कार' प्रसिद्ध साहित्यिक श्री. पु. ल. देशपांडे यांना त्यांच्या प्रदीर्घ साहित्यसेवेबद्दल देण्यात आला.



# फाळके पुरस्कार

फाळके पुरस्कार हा भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च राष्ट्रीय सन्मान आहे.

दादासाहेब फाळके यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांच्या नावे दरवर्षी भारत सरकारतर्फे हा पुरस्कार दिला जातो.

भारतीय चित्रपटसृष्टीचे आद्यजनक म्हणून कै. दादासाहेब फाळके यांचे नाव चित्रपटसृष्टीत अजरामर झाले आहे. पहिले दिग्दर्शक, पहिले चित्रपटनिर्माते, पहिले सिने लॅबोरेटरियन म्हणूनही त्यांना मानाचे स्थान दिले जाते. महाराष्ट्रातील कर्तबगार व सिनेसृष्टीचा इतिहास घडविणाऱ्या दादासाहेबांच्या नावे भारत सरकारने सर्वोच्च राष्ट्रीय पुरस्कार सुरू करून, त्यांच्या कार्याची ऐतिहासिक नोंद घेतली आहे यात शंका नाही.

धुंडिराज गोविंद ऊर्फ दादासाहेब फाळके यांचा जन्म ३० एप्रिल १८७० रोजी त्र्यंबकेश्वर येथे झाला. मॅट्रिकनंतर मुंबईला जे. जे. स्कूल ऑफ आर्टस्‌मध्ये त्यांनी शिक्षण घेतले. बडोद्यास

कलातंत्राचा अभ्यास केला. फोटोलिथोचे तसेच सिनेमाटोग्राफीच्या शिक्षणासाठी ते दोन वेळा युरोपला जाऊन आले. १९१२ चे अखेरीस युरोपहून परतल्यावर त्यांनी 'हरिश्चंद्र' हा चित्रपट काढला. पुढे एक वर्षाने 'फाळके फिल्म' ही चित्रपटसंस्था काढली. चार-पाच वर्षांच्या कालावधीत या चित्रपटसंस्थेतर्फे त्यांनी २० हून अधिक चित्रपट काढले. १९१७ मध्ये मायाशंकर भट्ट, वामनराव आपटे व इतर काही मंडळींच्या साहाय्याने 'हिंदुस्थान सिनेमा फिल्म कंपनी' स्थापन केली. १९३९ पर्यंत त्यांनी बरेच चित्रपट काढले. कोल्हापूर सिनेटोनमध्ये काढलेला 'गंगावतरण' हा चित्रपट त्यांचा शेवटचा चित्रपट होय. दादासाहेबांनी जवळजवळ ४० चित्रपटांचे, लघुपटां आणि व्यंगपटांचे दिग्दर्शन केले आहे. राजा हरिश्चंद्र, सत्यवान-सावित्री, लंकादहन, मोहिनी-भस्मासुर, कालियामर्दन, श्रीकृष्णजन्म, महानंदा अशी काही गाजलेल्या चित्रपटांची नावे सांगता येतील. चित्रपटसृष्टीच्या सुरवातीच्या काळात कुशल दिग्दर्शक, सिनेमाटोग्राफर, कार्टुनिस्ट अशा सिनेतंत्रज्ञाप्रमाणेच चित्रपटाच्या आद्य जनकत्वाचा मानही दादासाहेबांनी कर्तृत्वाने पटकावला आहे. वयाच्या ७४ व्या वर्षी नाशिक मुक्कामी त्यांचे निधन झाले. भारतीय चित्रपटसृष्टीची सुरुवात करणे, गती देणे आणि वैभवाप्रत नेणे असे त्रिविध कार्य करणाऱ्या दादासाहेबांच्या जन्मशताब्दीपासून (१९७०) त्यांच्या नावे पुरस्कार देण्यास सुरुवात करून भारत सरकारने त्यांचे उचित असे चिरंतन स्मारक केले आहे.

भारतीय चित्रपटाच्या विकासासाठी उत्कृष्ट कामगिरी करणारा कलावंत, तंत्रज्ञ याची निवड फाळके पुरस्कारासाठी करण्यात

येते. माहिती आणि नभोवाणी मंत्रालयामार्फत यासाठी एक निवड-समिती नेमण्यात येते. चित्रपटसृष्टीतील ख्यातनाम व्यक्ती, चित्रपट-समीक्षक, तसेच समाजातील प्रतिष्ठित विचारवंत यांचा निवड समितीत समावेश असतो. दरवर्षी या समितीतर्फे चित्रपट-क्षेत्रात अतुलनीय कार्य करणाऱ्या एका व्यक्तीची शिफारस माहिती आणि नभोवाणी मंत्रालयाकडे केली जाते. प्रस्तुत खात्याचे मंत्री वरील शिफारशीनुसार योग्य त्या व्यक्तीची निवड करण्यात आल्याचे पत्रकार परिषदेत घोषित करतात.

फाळके पुरस्कारासाठी निवड झालेल्या कलावंत तंत्रज्ञास सुरवातीस वीस हजार रुपये रोख, सुवर्णकमळ व शाल दिली जात असे. आता रोख रकमेत वाढ करण्यात येऊन ती चाळीस हजार रुपये करण्यात आली. पुन्हा १९८५ पासून ही रक्कम एक लाख रुपये करण्यात आली आहे.

सुरवातीचा १९६९ चा फाळके पुरस्कार देविकाराणी यांना मिळाला होता. पृथ्वीराज कपूर यांना १९७१ साली मरणोत्तर पुरस्कार बहाल करण्यात आला. प्रसिद्ध चित्रपट-गायक पंकज मलिक यांना १९७२ चा पुरस्कार देण्यात आला. नौशाद अलींना संगीत दिग्दर्शन कार्याबद्दल १९८१ साली या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. ' उंबरठा ' या मराठी चित्रपटाचा याच साली गौरव करण्यात आला. ख्यातनाम चरित्र-अभिनेत्री दुर्गाबाई खोटे यांना वयाच्या सत्तराव्या वर्षी १९८४ मधील फाळके पुरस्कार बहाल करण्यात आला. दुर्गाबाईंची अभिनयाची सुरुवात मूक चित्रपटाच्या कालापासून झाली. ' अयोध्येचा राजा 'मध्ये त्यांना प्रमुख नायिकेची भूमिका मिळाली. प्रभात फिल्म, तसेच

न्यू थिएटर्स ह्या चित्रपटसंस्थांशी त्यांचा अनेक वर्षे संबंध होता. पुरस्कार जाहीर होण्याच्या थोडे दिवस आधी त्यांची केंद्रीय चित्रपट प्रमाणपत्र मंडळावर सदस्य म्हणून नियुक्ती झाली आहे.

मे १९८५ मध्ये राष्ट्रीय चित्रपट महोत्सवातील विविध पुरस्कारांबरोबर फाळके पुरस्कारही जाहीर करण्यात आला. नामवंत दिग्दर्शक सत्यजित रे यांची यावेळी पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. एक द्रष्टा आणि डोळस दिग्दर्शक म्हणून सत्यजित रे यांची ख्याती आहे.

१९८६ चा ' फाळके पुरस्कार ' व्ही. शांताराम यांना देण्यात आला. ५० वर्षांहून अधिक काल चित्रपटनिर्मितीच्या क्षेत्रात बहुमोल कार्य करणारे व्ही. शांताराम ' चित्रपति ' या सार्थ पदवीने ओळखले जातात. ' प्रभात ' चित्रपटसंस्थेनंतर त्यांनी ' राजकमल ' ही चित्रपटसंस्था स्थापन केली. डॉ. कोटणीस, स्त्री, झनक झनक पायल बाजे, नवरंग, गीत गाया पत्थरोंने इ. त्यांचे चित्रपट चिरस्मरणीय असे आहेत. ' शांतारामा ' हे त्यांनी लिहिलेले आत्मचरित्र वर्षापूर्वी प्रसिद्ध झाले असून, भारतीय चित्रपटसंस्थेचा इतिहासच याद्वारे प्रकाशात येत आहे.

१९८७ चे मानकरी बी. नागी रेड्डी हे तेलुगु, तमिळ, हिंदी, कन्नड, मल्याळी भाषेतील चित्रपटांचे दिग्दर्शक म्हणून प्रसिद्ध आहेत.

* 1990 चा फाळके * पुरस्कार लता मंगेशकर यांना देण्यात आला आहे.

फाळके पुरस्काराने सन्मानित झालेल्या अलीकडील ५ वर्षांतील कलाकार व्यक्ती–


१९८७ बी. नागी रेड्डी

१९८६ व्ही. शांताराम

१९८५ सत्यजित रे

१९८४ दुर्गा खोटे

१९८३ नौशाद अली व ‘ उंबरठा ’ चित्रपट.




**शिवरायाचे आठवावे रूप । शिवरायाचा आठवावा प्रताप ।**
**शिवरायाचा आठवावा साक्षेप । भूमंडळी ।।**

असे रामदासांनी छत्रपती शिवाजीमहाराजांबद्दल म्हटले आहे. शिवाजीमहाराजांना 'महामानव' असे संबोधले जाते. 'गोब्राह्मणप्रतिपालक' ही त्यांची बिरुदावली होती. मोगलांच्या जुलमी सत्तेपासून प्रजेची सुटका व्हावी यासाठी त्यांनी स्वराज्याची स्थापना केली. आपापसात भांडणाऱ्या मराठा सरदार, सरंजामदार यांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. देश बलवान होण्यासाठी आपण स्वत: बलवान असायला हवे, असे ते म्हणायचे. आरोग्यसंपन्न देशासाठी प्रजाही आरोग्यसंपन्न असायला हवी. आजच्या युगातही प्रत्येक देशाला हा नियम लागू पडतो. खेळातून

बलसंपन्नता लाभतेच, पण मनही तितकेच आरोग्यसंपन्न होते. आजच्या युगात तर राष्ट्रीय स्पर्धांपासून ऑलिम्पिक क्रीडास्पर्धांपर्यंत विविध स्तरावर क्रीडास्पर्धा होत असल्याने खेळांचे महत्त्व वाढतेच आहे. खेळांचे हे महत्त्व लक्षात घेऊन महाराष्ट्र सरकारने १९६९–७० पासून 'शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार' सुरू केला आहे.

खेळाची आवड, वाढ आणि विकास व्हावा, देशात आणि परदेशात होणाऱ्या क्रीडास्पर्धांतून महाराष्ट्रातील क्रीडापटूंनी उज्ज्वल यश संपादन करावे, आम्ही महाराष्ट्रातील तरुण–तरुणी सर्व चांगल्या गोष्टीत आघाडीवर आहोत हे दाखवून देता यावे, ही स्फूर्ती व प्रेरणा शिवछत्रपती पुरस्कारामागे आहे.

आपल्या देशाने मान्य केलेले क्रीडाप्रकार म्हणजे कुस्ती, मल्लखांब, हुतुतू, खोखो, हॉकी, क्रिकेट, जलतरण, रायफल शूटिंग, बुद्धिबळ इत्यादी खेळांसाठी शिवछत्रपती पुरस्कार दिला जातो. या पुरस्काराच्या नियमाप्रमाणे पुरुष विभागात ३१ व महिला विभागात २२ क्रीडाप्रकारांना हा पुरस्कार दिला जातो. त्याशिवाय अपंग महिला व पुरुष क्रीडापटूंना, तसेच क्रीडाक्षेत्रात दीर्घकाळ उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींनाही हा पुरस्कार दिला जातो.

वरील खेळांत प्राविण्य मिळविणाऱ्या खेळाडूंकडून दरवर्षी अर्ज मागविण्यात येतात. क्रीडा मंत्रालयाच्या आदेशानुसार हे अर्ज क्रीडा युवक सेवा संचालक यांच्याकडे पाठवावे लागतात. हे अर्ज त्या त्या खेळातील क्रीडा संघटनांमार्फत सादर करावे लागतात.

प्रत्येक खेळासाठी स्वतंत्र समिती नेमली जाते. या समितीत

त्या क्रीडाप्रकारातील पंच किंवा उत्कृष्ट क्रीडापटू, क्रीडा संघटनेचा एक प्रतिनिधी, राज्यक्रीडा परिषदेचा सभासद, इत्यादी व्यक्ती असतात. एखाद्या क्रीडापटूस पुरस्कार द्यायचा झाला तर त्याची मागील तीन वर्षांची त्या खेळातील कामगिरी लक्षात घेतली जाते. यशाची वाढती कमान, त्या खेळातील त्याने प्रस्थापित केलेले विक्रम यावर त्याला कमीअधिक गुण दिले जातात. हे मूल्यांकन करताना दुसऱ्या क्रीडापटूवर अन्याय होणार नाही याचीही दक्षता घ्यावी लागते. सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या क्रीडापटूची शिफारस या समितीद्वारे शासनाकडे केली जाते. अशा रीतीने सर्व क्रीडा समित्यांकडे त्या त्या क्रीडापटूंची नावे आल्यानंतर शासन त्यावर शिक्कामोर्तब करून शिवछत्रपती पुरस्कार जाहीर करते.

क्रीडापटूंशिवाय क्रीडासंघटक, पंच, क्रीडाक्षेत्रातील कार्यकर्ते, यांचाही शिवछत्रपती पुरस्काराने गौरव केला जातो. क्रीडाक्षेत्रासाठी आयुष्य खर्ची घातलेल्या कार्यकर्त्यांचा सन्मान म्हणजे त्यांच्या कार्याची पावतीच असते.

एखाद्या वर्षी एखाद्या क्रीडा विभागात पुरस्कारयोग्य क्रीडापटू आढळला नाही तर, त्या क्रीडाप्रकारातील शिवछत्रपती पुरस्कार दिला जात नाही.

शिवछत्रपती पुरस्कार लाभलेल्या क्रीडापटूंचा खास समारंभात गौरव केला जातो. त्यांना शिवछत्रपतींची प्रतिमा असलेले गौरवचिन्ह, ब्लेजर व रोख १००१।– रुपये असा पुरस्कार दिला जात असे. १९८५ पासून रोख रकमेत वाढ केल्यामुळे रोख ५०००।–रुपये दिले जातात.

महाराष्ट्रातच काय, पण देशात आणि देशाबाहेरही नावलौकिक झालेले अनेक क्षेत्रांतील क्रीडापटू शिवछत्रपती पुरस्काराने सन्मानित झालेले आहेत. या सर्वांची यादी देता येणार नाही. मल्लविद्येतील दादू चौगुले, चंबा मुत्नाळ, बिराजदार, पै. आंदळकरपासून उगवता मल्ल रामचंद्र सारंग ही काही नावे नजरेत भरतात. क्रिकेटमधील वाडेकर, गावस्कर, रवी शास्त्री असे क्रिकेटवीर, आंतरराष्ट्रीय ख्याती मिळविलेले रायफल शूटिंगच्या क्षेत्रातील जयसिंग कुसाळे व रमेश कुसाळे हे पितापुत्र, प्रवीण ठिपसे, हेमंत जोगदेव, शैलजा साळोखे, रोहिणी खाडिलकर, इत्यादी क्रीडापटूंनी याआधीच आपली नावे कमावली आहेत. छत्रपती पुरस्कार मिळविलेल्या बऱ्याच क्रीडापटूंनी 'अर्जुनवीर' हा राष्ट्रीय सर्वोच्च क्रीडापुरस्कारही घेतलेला आहे. पुरस्कार सुरू झाल्यापासून १९८६ पर्यंत एकूण ४६३ क्रीडापटूंना हा पुरस्कार देण्यात आला. आता अपंग क्रीडापटूंसाठी विशेष पुरस्कार ठेवण्यात आले आहेत. तसेच १९८७ पासून दादाजी कोंडदेव व खाशाबा जाधव यांच्या स्मरणार्थ आणखी दोन पुरस्कार सुरू होत आहेत.

छत्रपती पुरस्कार हा महाराष्ट्र राज्यापुरता मर्यादित आहे हे खरे. राज्यातून राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय आणि ऑलिम्पिक स्पर्धांसाठी त्या त्या क्षेत्रातील क्रीडापटू यातूनच निर्माण व्हायचे आहेत हेही विसरून चालणार नाही. शिवछत्रपती पुरस्कारातून आपल्या क्रीडापटूंना ह्या प्रेरणा निश्चित मिळत राहतील यात शंका नाही. युवक-युवतींनी शालेय व विद्यापीठ क्रीडास्पर्धेत भाग घेऊन त्यातून यश संपादन करावे आणि अशा मोठ्या पुरस्कारासाठी आतापासूनच तयारी करावी यातच त्यांचे भाग्य आहे.



छत्रपती शिवाजीमहाराजांनंतर लोककल्याणकारी, जनहितदक्ष व पददलितांचा कैवारी राजा म्हणून छत्रपती शाहू महाराजांचे नाव घ्यावे लागेल. इंग्रज राजवटीत भारतात अनेक संस्थानिक होते; पण सर्वसामान्य जनतेकडे लक्ष देणारा संस्थानिक जवळजवळ नव्हताच, असे म्हटले तरी चालेल. याला अपवाद शाहू राजा होते. जनतेचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी अनेक कल्याणकारी योजना त्यांनी हाती घेतल्या, राबविल्या, यशस्वी केल्या. त्यासाठी सामाजिक रूढींविरुद्ध कित्येकदा बंड पुकारावे लागले. लोकक्षोभ ओढवून घ्यावा लागला. पण सर्वसामान्य जनतेच्या कल्याणासाठी मूठभर लोकांच्या विरोधाकडे त्यांनी कानाडोळा केला. राजकारणाबरोबरच संगीत, नाटक, कुस्ती, शिकार, शिक्षण,

शेती–पाटबंधारे अशा सर्वांगीण क्षेत्राकडे शाहूराजांनी जाणीवपूर्वक लक्ष पुरवून ती क्षेत्रे समृद्ध करण्याचा प्रयत्न केला. राधानगरी धरण, कुस्तीचे मैदान, साठमारी, इत्यादी महाराजांच्या कार्याचे दिसून येणारे ठसे आहेत. पण त्यांच्या सामाजिक कार्याची परंपरा तितकीच खोलवर रुजलेली आहे. लोकक्षोभ पत्करून शाहू महाराजांनी दलितांना उदार अंतःकरणाने जवळ केले. रयतेचा हा राजा राजवाड्यात राहात असला तरी झोपडीत जाऊन तिथली भाकरी हातात घेऊन तो खात असे. सर्व थरातील लोकांत मिसळून त्यांची सुखदुःखे जाणून घेऊन ती दूर करण्याचा प्रयत्न शाहूराजांनी केलेला आहे. त्यांचे तत्त्वज्ञान रांगडेपणातून चटकन दिसून येत नाही; पण क्रियाशीलता, विचारीपणा आणि नवसमाजनिर्मितीचे कार्य ह्यातून ते स्पष्ट होत गेले आहे. म्हणूनच शाहूराजा म्हणजे समाजप्रबोधन करणारा कल्याणकारी राजा म्हणून ओळखला जातो. अशा राजांचे आणि कार्यकर्त्यांचे कार्य कधी पूर्ण होत नसते. पुढील पिढ्यांनी...त्यांच्या पुढील पिढ्यांनी हे कार्य नेटाने पुढे पुढे न्यावे लागते. नवसमाजनिर्मिती ही अशा नेतृत्वातूनच होत असते. शाहूराजांच्या कार्याचे सर्व संदर्भ लक्षात घेऊन सर्वांगीण सामाजिक कार्य करणाऱ्या नेतृत्वाचा शोध घेण्याची प्रक्रिया पुढे चालू ठेवण्याचा विचार 'शाहू मेमोरियल ट्रस्टने' घेतला तो यासाठीच.

शाहूमहाराजांच्या स्मृतिप्रीत्यर्थ १९७४ साली ' राजश्री शाहू छत्रपती मेमोरियल ट्रस्टची ' स्थापना झाली. करवीर नगरीतील या केंद्राद्वारे शाहूंचे विचार व कार्य रुजावे, प्रसारित व्हावे यासाठी अद्यावत वास्तूची उभारणी करण्यात आली. या शाहू

स्मारक गृहात अद्यावत सभागृह, कलादालन, ग्रंथालय, अतिथी-गृह तसेच सिने प्रोजेक्टर्स आहेत. विचारवंतांच्या सभा, चर्चा, परिसंवाद, कलाचित्र, प्रदर्शने, दुर्मिळ चित्रपट व नाटके इत्यादी कार्यक्रमांद्वारे समाजप्रबोधनाचे कार्य नेटाने पुढे चालले आहे.

याहीपुढे जाऊन काही हाती घेणे आवश्यक आहे, ह्या जाणिवेने ट्रस्टचे अध्यक्ष कोल्हापूरचे जिल्हाधिकारी यांनी दरवर्षी शाहू पुरस्कार देण्याची योजना मांडली. तिचा पाठपुरावा करून १९८४ पासून पुरस्कारयोजना कार्यान्वितही केली.

राजश्री शाहूंचे विचार, कार्य, त्यांची अपुरी स्वप्ने यांचा आजच्या संदर्भातून अर्थ लावून त्यांच्या कार्याशी निगडित समर्पित वृत्तीने काम करणाऱ्या भारतातील कोणत्याही नेतृत्वास 'शाहू पुरस्कार' देण्याचे ट्रस्टने ठरविले. पुरस्कारविजेत्यास ५०००।–रुपये रोख, मानपत्र व राजर्षी शाहू छत्रपतींची प्रतिमा असलेले मानचिन्ह देण्यात येते. दरवर्षी शाहू जयंतीदिवशी पुरस्कार-वितरण समारंभ साजरा केला जातो.

पुरस्कारयोग्य व्यक्तीची निवड करण्यासाठी भारतातील सर्व विद्यापीठे, शिक्षणसंस्था, समाजकल्याण संस्था, तसेच सांस्कृतिक व कलासंस्था इत्यादींकडून व्यक्तींच्या नावाची शिफारस, तसेच त्यांचे आजवरचे कार्य इत्यादी माहिती मागविली जाते. पुरस्कारासाठी कुणाला व्यक्तिगत अर्ज करता येत नाही. संस्थांमार्फत एखाद्या व्यक्तीची त्याच्या कार्यासह शिफारस होऊन आलेल्या अर्जांचाच पुरस्कारासाठी विचार करण्यात येतो.

आलेल्या सर्व अर्जांची छाननी करून त्यातून पात्र अशा एकाच व्यक्तीची पुरस्कारासाठी निवड व्हावी यासाठी विश्वस्त मंडळा-

मार्फत एक निवड समिती नेमली जाते. ही निवड समिती आलेल्या अर्जांचा व त्यासोबत असलेल्या व्यक्तिगत कार्याचा अभ्यास करून योग्य नावांची शिफारस विश्वस्त मंडळाकडे करीत असते. विश्वस्त मंडळाच्या बैठकीत या नावावर शिक्कामोर्तब होते. या शिफारशीमधील व्यक्तींशिवाय विश्वस्त मंडळ स्वतःचे अधिकारातही योग्य अशा व्यक्तीची निवड करू शकते. जर एखाद्या वर्षी पुरस्कारयोग्य व्यक्ती आढळली नाही तर, त्या वर्षी पुरस्कार दिला जात नाही.

१९८४ साली पहिला शाहू पुरस्कार करवीरचे ज्येष्ठ समाजसेवक भाई माधवराव बागल यांना बहाल करण्यात आला. करवीर संस्थानचे पंतप्रधान म्हणून भाईजींनी शाहूमहाराजांना साथ दिली होती. त्यांच्या धोरणांचा पाठपुरावा भाईजींनी महाराजांच्या हयातीत आणि त्यानंतरही सतत केला. कै. भाई बागल एक कठोर तत्त्वचिंतक, समाज सुधारण्याची तळमळ असणारा कार्यकर्ता, स्वातंत्र्यवीर, त्याचप्रमाणे कलानगरीतील थोर कलावंत, लेखक म्हणून सर्व थरामध्ये प्रसिद्ध होते. नव्वदी उलटली तरी मनाने ते तरुण व उत्साही होते. पहिल्या 'शाहू पुरस्काराने' त्यांचा सन्मान म्हणजे गुरूने दिलेला प्रसादच म्हणावा लागेल !

१९८५ चा द्वितीय शाहू पुरस्कार शाहू जयंतीदिवशी बहाल केला गेला तो श्रीमती मेहरुन्निसा हमीद दलवाई यांना. मुस्लीम समाजाचे पहिले समाजसुधारक-पैगंबरवासी हमीद दलवाई यांच्या श्रीमती मेहरुन्निसा ह्या पत्नी होत. हमीद दलवाईंचे मुस्लीम सत्य शोधनाचे कार्य त्या नेटाने पुढे चालवीत आहेत. पुराणमताभिमानी कट्टर मुस्लीम समाजातील रूढी, परंपरा

मोडून जागृतीचे कार्य हमीद दलवाई यांच्या आकस्मिक निधनामुळे बंद पडते की काय अशी भीती वाटत होती. पण मेहरुन्निसाबाईंनी हे कार्य धैर्याने आपल्या शिरावर घेतले आहे. श्रीमती दलवाई यांचा १९८० मध्ये ‘ सुसन बी अँथनी’ तसेच १९८३ मध्ये ‘ माईसाहेब पारखे आदर्श माता पुरस्कार ’ देऊन गौरव करण्यात आला होता.

१९८६ चा पुरस्कार क्रीडाक्षेत्रातील असामान्य कामगिरी-बद्दल करवीरचे सुपुत्र श्री. मेघनाथ नागेशकर यांना देण्यात आला. १९८७ चा पुरस्कार प्रसिद्ध चित्रपटनिर्माते श्री. व्ही. शांताराम यांना बहाल केला आहे. प्रदीर्घ चित्रपटसेवेतून समाज-जागृतीचे कार्य ते करीत आहेत असे गौरवपत्रात म्हटले होते.

* *

राजर्षी छत्रपती शाहू पुरस्काराने सन्मानित झालेल्या अली-कडील चार वर्षातील थोर व्यक्ती–

१९८७ श्री. व्ही. शांताराम

१९८६ श्री. मेघनाथ नागेशकर

१९८५ श्रीमती मेहरुन्निसा हमीद दलवाई

१९८४ भाई माधवराव बागल.

BVBK-0402248